रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
• वर्ष १८ • अंक २६६
www.ramprahar.com
• बुधवार, १५ एप्रिल २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

## लोकसभेत महिला आरक्षणाचा मार्ग होणार मोकळा




**नवी दिल्ली :** केंद्रातील मोदी सरकारने लोकसभेतील सदस्यांची संख्या ५४३वरून ८५०पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यामुळे दीर्घ काळापासून प्रलंबित असलेले महिला आरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीचा आणि नवीन मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा मार्ग मोकळा होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार लोकसभेच्या विस्ताराचा आराखडा असलेला विधेयकाचा मसुदा खासदारांना पाठवण्यात आला आहे. संसदेच्या तीन दिवसांच्या विशेष अधिवेशनात या महत्त्वाच्या घटनादुरूस्ती मंजूर करून घेण्याची सरकारची योजना आहे. लोकसभेच्या विस्तारासाठी संविधान दुरूस्तीच्या दृष्टीने पुढील पावले उचलण्यापूर्वी सरकारने खासदारांना या विधेयकाचा मसुदा पाठवला आहे. लोकसभेचा विस्तार करण्यात आल्यानंतर संसदेतील प्रतिनिधित्व यासंबंधीच्या रचनेत मोठे बदल होण्याची शक्यता आहे.

## अंतरंग

शिवसमाधीस्थळी प्री-वेडिंग शूट; व्हिडीओ व्हायरल/२
वीज समस्येमुळे मुरूडमध्ये फक्त एक तास पाणीपुरवठा/५
पनवेल चिपळे येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा रंगली/८

# महामानवाला अभिवादन!

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती मंगळवारी (दि. १४) पनवेलसह रायगड जिल्ह्यात उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने जिल्ह्यातील शहरी भागांमध्ये रॅली काढण्यात आल्या, तर ग्रामीण भागामध्ये सायंकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून ढोल-ताशा, लेझीम, चित्ररथांसह भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. त्याचबरोबर निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करून डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आला. मिरवणुकीनंतर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे मुख्य कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.









प्रारंभी सकाळी ७ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच यावेळी या ठिकाणी खास तयार करण्यात आलेल्या भारताच्या संविधान शिल्पाचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील यांच्यासह भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, लोकनेते दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महेश कुमार मेघमाळे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (पान २ वर..)



**खांदा कॉलनी : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**



**पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त करंजाडे व वडघर परिसरात आयोजित विविध कार्यक्रमांना आमदार महेश बालदी यांनी भेट देत महामानवाला अभिवादन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य सोनाली जितेकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक गणेश कडू, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, वडघर विभागीय अध्यक्ष समीर केणी, गजानन पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुनील भोईर, नंदू भोईर, बिपीन गायकवाड, अतिश साबळे, कैलास शेलार, अजय साबळे, गणेश कदम आदी उपस्थित होते.** (वृत्त पान ३ वर..)

## उरणच्या पीरवाडी किनाऱ्यावर पाच पर्यटकांची मृत्यूशी झुंज

### सागरी सुरक्षा रक्षकांमुळे अनर्थ टळला

**उरण : बातमीदार**

उरण येथील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेला पीरवाडी किनारा एका थरारक घटनेमुळे चर्चेत आला आहे. समुद्रात फिरायला गेलेले पाच पर्यटक भरतीमुळे खडकांमध्ये अडकले होते. सागर सुरक्षा रक्षकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे या पाचही जणांचे प्राण वाचवण्यात यश आले आहे.



काही पर्यटक सोमवारी (दि.१३) संध्याकाळी उत्साहाच्या भरात किनाऱ्यापासून लांब असलेल्या खडकांवर गेले होते. यावेळी समुद्राला भरती आल्याने पाण्याचा वेढा वाढला आणि हे पर्यटक मध्येच अडकून पडले. जीवाची भीती निर्माण झाल्याने पर्यटकांनी मदतीसाठी आरडाओरडा सुरू केला. यावेळी तिथे तैनात असलेल्या सागर सुरक्षा रक्षकांनी वेळ न घालवता तातडीने धाव घेतली आणि पाचही पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यामुळे त्यांचा जीव वाचला.

पीरवाडी किनाऱ्यावर वर्षभर पर्यटकांची मोठी गर्दी असते. येथे खाण्या-पिण्याची आणि मनोरंजनाची उत्तम सोय असते. त्यामुळे पर्यटक आकर्षित होतात, पण नवीन येणाऱ्या पर्यटकांना पाण्याचा आणि खडकांचा अंदाज येत नाही. अनेकदा उत्साहाच्या भरात पर्यटक खोल पाण्यात किंवा खडकांवर जातात आणि आपला जीव धोक्यात घालतात. सोमवारी झालेल्या घटनेत केवळ सुरक्षा रक्षकांच्या तत्परतेमुळे सर्वांचे प्राण वाचले; अन्यथा मोठा अनर्थ घडला असता.

दरम्यान, पीरवाडी किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांना योग्य दिशा मिळावी आणि असे अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठिकठिकाणी माहिती फलक आणि इशारा देणारे बोर्ड लावावेत, अशी मागणी केली जात आहे. त्याचप्रमाणे पर्यटकांनीही समुद्रात उतरताना खबरदारी घ्यावी, भरती-ओहोटीच्या वेळा पाळूनच मौज करावी, असा सूर व्यक्त होत आहे.

## निवडक

### छत्तीसगडमधील वीज प्रकल्पात भीषण स्फोट; नऊ जण ठार

**रायपूर :** छत्तीसगडमधील शक्ती जिल्ह्यात सिंघीतराई येथे मंगळवारी (दि.१४) दुपारी वेदांता वीज प्रकल्पाच्या बॉयलर युनिटमध्ये भीषण स्फोट झाला. यामध्ये किमान नऊ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. काही लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती असून बचावकार्य सुरू आहे, तर जखमींवर वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. यातील काहींची प्रकृती नाजूक आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे.

### सम्राट चौधरी होणार बिहारचे नवे मुख्यमंत्री



**पाटणा :** जदयूचे नेते खासदार नितीश कुमार यांनी मंगळवारी (दि. १४) बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. यानंतर भाजप आमदारांच्या विधीमंडळ नेतेपदी सम्राट चौधरी यांची एकमताने निवड झाली आहे. त्यामुळे आता चौधरी बिहारचे पुढचे मुख्यमंत्री असतील, हे स्पष्ट झाले आहे. चौधरी यांच्या या निवडीमुळे बिहारच्या राजकारणात आता नव्या पर्वाला सुरुवात होणार आहे.

## अमरावती अश्लील व्हिडीओ प्रकरणातील आरोपीला अटक

### सात दिवसांची पोलीस कोठडी




**अमरावती : प्रतिनिधी**

राज्यात अशोक खरात प्रकरणाची चर्चा ताजी असतानाच अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे एका १९ वर्षीय तरुणाचे वेगवेगळ्या तरुणींसोबतचे अश्लील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अमरावती पोलिसांनी मुख्य आरोपी अयान अहमद तनवीर अहमद याला सोमवारी (दि.१३) उशिरा रात्री ताब्यात घेतले. त्याला अचलपूर येथील न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

तरुणींना प्रेमजालात फसवून त्यांचे आक्षेपार्ह व्हिडीओ तयार केल्याचा आणि ते सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा ठपका अयानवर ठेवण्यात आला आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर जुळ्या शहरासह संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून भाजपासह विविध हिंदुत्ववादी संघटनांनी या नराधमाला कठोर शिक्षा करण्याची मागणी लावून धरली होती.

आरोपी अयानने परिसरातील १००पेक्षा जास्त तरुणींना जाळ्यात ओढले असून त्यांचे अश्लील फोटो व व्हिडीओ काढून ब्लॅकमेल केले जात असल्याचा आरोप आहे. यात एक मोठे रॅकेट सक्रिय असून मुलींचे व्हिडीओ तयार करून त्यांना वेश्या व्यवसायासाठी धमकावले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

प्रकरण उघडकीस येताच आरोपी अयान अहमद कुटुंबासह फरार झाला होता, मात्र पोलिसांनी त्याला शोधून काढत बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणाची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

## माथेरान पर्यटनस्थळी प्लास्टिक रेनकोटला बंदी

**माथेरान : प्रतिनिधी**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरानमध्ये पावसाळ्यात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना प्लास्टिक रेनकोटवर बंदी घालण्यात आली आहे. पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील अशा माथेरानचे पर्यावरण अबाधित राखण्यासाठी येथील नगर परिषदेच्या पर्यावरण, पर्यटन व नियोजन समितीच्या बैठकीत हा ठराव मंजूर करण्यात आला.

पावसाळ्यात माथेरानला भटकंती, ट्रेकिंग किंवा निवांत मुक्काम करण्यासाठी येणारे अनेक पर्यटक सोबत प्लास्टिक रेनकोट आणतात, मात्र परतीच्या प्रवासात हेच रेनकोट रस्त्यावर, दऱ्याखोऱ्यांत फेकले जातात. यामुळे येथील पर्यावरण संवर्धनाचा बोजवारा उडतो तसेच निसर्गरम्य परिसराचे विद्रुपीकरण होते. म्हणूनच प्लास्टिक रेनकोट बंदीचा निर्णय घेतला गेला आहे. (सविस्तर वृत्त पान ५ वर..)

## मुंबईतील ड्रग्ज पार्टीप्रकरणी आरोपींना पोलीस कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**




मुंबईतील नेस्को सेंटरमध्ये झालेल्या हाय-प्रोफाईल ड्रग्ज पार्टीप्रकरणी अटकेत असलेल्या सहा आरोपींना न्यायालयाने १६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

मुंबईच्या गोरेगाव येथील नेस्को एक्झिबिशन सेंटरमध्ये एका शनिवारी रात्री लेट-नाईट टेक्नो म्युझिक कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी मोठ्या प्रमाणात तरूणाई लोटली होती. अनेक तरुणांनी ड्रग्जचे सेवन केले होते. अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे यातील दोन उच्चशिक्षित एमबीए विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर एका विद्यार्थिनीची प्रकृती चिंताजनक आहे.

या प्रकरणी पोलिसांनी कठोर पावले उचलत पार्टीचा मुख्य आयोजक विहान उर्फ आकाश सामल, नेस्को सेंटरचा व्यवस्थापक सनी जैन, सुरक्षा व्यवस्थापक बालकृष्ण कुरुप, ड्रग्स पुरवठादार रौनक खंडेलवाल, प्रतीक पांडे ड्रग्स विक्रेता यांना अटक केली. यानंतर तपासाचा वेग व व्याप्ती वाढवत मुख्य ड्रग्स विक्रेता आनंद पटेल याला पोलिसांनी फिल्मी स्टाईलने बेड्या ठोकल्या.

आरोपींना मंगळवारी (दि.१४) बोरीवली दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले होते, तेव्हा न्यायालयाने सर्वांना १६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.



शुभेच्छुक : अरुणशेठ भगत, रतनशेठ भगत, भूषण भगत

## महाराष्ट्रात उष्णतेची लाट

### अकोला ठरले जगात सर्वाधिक उष्ण शहर



**अकोला : प्रतिनिधी**

विदर्भातील सर्वच जिल्ह्यांत तापमानाने चाळीशी पार केली आहे. अकोलाखेरीज कर्नाटकातील कलबुर्गी येथेही ४४ अंश तापमान होते. एल्डोराडो या संकेतस्थळानुसार मंगळवारी (दि.१४) ही दोन शहरे जगभरातील सर्वाधिक उष्ण शहरे ठरली. त्याखालोखाल अमरावती येथे ४३.८ अंश तापमानाची नोंद झाली. हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे उष्ण शहर होते.

याखेरीज वर्धा येथे ४३.५ अंश तापमान होते. हे जगातील सातव्या क्रमांकाचे उष्ण शहर ठरले तसेच तेलंगणातील आदिलाबाद (४३.३ अंश), सोलापूर (४३.२) आणि अनंतपूर (४३.१ अंश) ही अनुक्रमे जगातील आठव्या, दहाव्या आणि चौदाव्या क्रमांकाची उष्ण शहरे ठरले. त्यामुळे जगातील पहिल्या १५ उष्ण शहरांपैकी जवळपास निम्मी अर्थात सात शहरे ही भारतातील आहेत. यातील चार शहरे महाराष्ट्रातील असून त्यापैकी तीन ही विदर्भातील आहेत.

महाराष्ट्राची राजधानी असणाऱ्या मुंबईसह आजूबाजूच्या जिल्ह्यांमध्येही तापमानात वाढ झाली आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याचा इशारा दिला आहे. या दरम्यान नागरिकांनी काळजी घ्यावी, कामाव्यतिरिक्त शक्यतो दुपारी घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशानाकडून करण्यात आले आहे.

## रोह्यात दोन बालविवाह रोखण्यात यश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बालविवाहाविरोधात पोलिसांनी प्रभावी पावले उचलत दोन बालविवाह रोखण्यात यश मिळवले असून एका प्रकरणात कायद्याचे उल्लंघन केल्याने गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अल्पवयीन मुलींचे आयुष्य अंधारात जाण्यापासून वाचले आहे.



पहिली कारवाई गायचोळे आदिवासीवाडीत १६ मार्च २०२६ रोजी करण्यात आली. १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह त्याच वाडीत राहणाऱ्या २० वर्षीय तरुणासोबत लावण्याची तयारी सुरू होती. याबाबत महिला पोलीस मंगल टेमकर यांना गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तत्काळ पथकासह घटनास्थळी धाव घेतली. संबंधितांना ताब्यात घेऊन बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अंतर्गत कायद्याची माहिती देत समुपदेशन करण्यात आले आणि विवाह थांबवण्यात आला.

दुसरी कारवाईही त्याच परिसरात करण्यात आली. मे २०२६मध्ये नियोजित असलेल्या आणखी एका बालविवाहाची माहिती चणेरा बीट अंमलदार नरेश मोरे यांना मिळाली. प्रभारी अधिकारी सुयश कुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी जाऊन संबंधितांना समज देत हा विवाहही रोखला. स्थानिक ग्रामस्थ व ग्रामसेवक यांच्या मदतीने समुपदेशन करीत कुटुंबियांचे मतपरिवर्तन करण्यात आले.

दरम्यान, भुवनेश्वर आदिवासीवाडीत घडलेल्या एका गंभीर प्रकरणात पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. २८ जून २०२५ रोजी अल्पवयीन मुलीचा विवाह लावण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी पूर्वसूचना देऊनही संबंधितांनी हळदी समारंभ पार पाडला. तपासात मुलगी अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तसेच तिच्याशी शारीरिक संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याचे उघड झाल्याने आरोपी अक्षय पवार व इतर संबंधितांवर भा.न्या.सं. तसेच पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'परवानाधारक रिक्षा, टॅक्सीचालकांसाठी १ मेपासून मराठी भाषा आवश्यक'

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या १ मे, महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे आवश्यक करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी



दिली आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे, हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले की, ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे असल्याचेही ते म्हाणाले.

म्हणूनच १ मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहिता येणे व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील. तसेच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले आहे.

# शिवसमाधीस्थळी प्री-वेडिंग शूटींग; व्हिडीओ व्हायरल

**महाड : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतींनी भारलेला किल्ले रायगड पुन्हा एकदा वादाच्या केंद्रस्थानी आला आहे. किल्ले रायगडावरील श्रद्धास्थान असलेल्या शिवसमाधी परिसरात एका जोडप्याने प्रि-वेडिंग शूट केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिवप्रेमींकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये संबंधित जोडपे शिवसमाधी परिसरात चित्रिकरण करताना दिसत असून, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या या स्थळाच्या पावित्र्याचा भंग झाल्याची भावना शिवप्रेमींनी व्यक्त केली आहे. शिवभक्तांच्या भावना दुखावणारे हे कृत्य असल्याचे सांगत अनेकांनी सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.

किल्ले रायगडावर प्रि-वेडिंग शुट केल्याचा व्हिडिओ व्हायरल होत असताना मंत्री भरत गोगावले यांनी प्री-वेडिंग किंवा इतर काही कराल तर जमणार नाही अशा चोख शब्दात प्रि-वेडिंग केलेल्या व्यक्तीबद्दल जाहीर निषेध व्यक्त केला. ज्याने कोणी केले असेल त्यांनी माफी मागावी. किल्ले रायगड वरती २४ तास सुरक्षा असतांना चुकीचे झाले असेल तर सुरक्षा पोलीस बदलले जातील मंत्री भरत गोगावले म्हणाले.

"किल्ले रायगड हा केवळ पर्यटनस्थळ नसून तो महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहे. अशा पवित्र स्थळी मनोरंजनाच्या नावाखाली प्रि-वेडिंग शूट करणे अत्यंत अयोग्य आहे," अशी भावना शिवप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

केंद्रिय पुरातत्व विभाग आणि संबंधित प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन जबाबदार व्यक्तींवर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी स्पष्ट नियमावली लागू करावी, अशी मागणी होत आहे.

# अलिबागमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती मंगळवारी (दि. १४) अलिबागमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. शहरी भागांमध्ये रॅली काढण्यात आल्या.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ग्रामीण भागामध्ये सायंकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे अलिबाग शहरातील समता सप्ताहानिमित्त जयभीम रॅली काढण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी गर्दी केली होती.



आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, नगराध्यक्ष अक्षया नाईक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यला आभिवादन केले. यावेळी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, अलिबाग नगरपरिषद मुख्याधिकारी सागर साळुंखे ,कार्यालय अधीक्षक माधुरी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते .

सामाजिक न्याय विभागातर्फे अलिबाग शहरात पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. या पदयात्रेमध्ये सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी तसेच कार्यालयाच्या अधिनस्त मुलींचे व मुलांचे शासकीय वसतिगृह अलिबाग येथील कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रतिनिष्ठ नागरिक सहभागी झाले होते.अलिबाग शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नगर परिषद मराठी शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली.

## खोपोली परिसरात सायकलचोरांचा सुळसुळाट

**खोपोली : प्रतिनिधी**

परिसरात सायकलचोरांचा सुळसुळाट झाला असून विशेषतः लहान मुलांच्या सायकल चोरीला जाण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे पालक वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावातील एकाच दिवशी लहान मुलांच्या तीन सायकली चोरीला जाण्याचा प्रकार घडला, विराज माडपे, आराध्य मुंडे, व पवार अशी तीन मुलांची नावे असून सायंकाळी दारात उभी केलेली सायकल चोरून नेल्याचे पोलिसांकडे तक्रार देण्यात आली आहे. या चोरीच्या प्रकाराने लव्हेज व परिसरात पालक वर्गात खळबळ उडाली आहे

दरम्यान याबाबत खोपोली पोलिसांमध्ये पालकांनी तक्रार दाखल केली असून, याबाबत पोलिसांनी परिसरातील शिशी टीव्ही कॅमेरे तपासण्यात प्रारंभ केला असून, लवकरच आरोपीला आम्ही अटक करू असे यावेळी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी पत्रकारांशी बोलताना माहिती दिली,मागील काही महिन्यांपासून भंगारवाल्या व्यापारांचा खोपोली व परिसरात पसारा वाढत असून या भंगार विक्रेत्यांकडे पोलिसांनी लक्ष द्यावे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे

# मतदार याद्यांचा पुनरावलोकन कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुडजंजिरा येथे जमातुल मुस्लिमीन मोहल्ला बाजार यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार यादींचे पुनरावलोकन (एस.आय.आर.) जनजागृती व मॅपिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला.या शिबिरात मुरुड शहरातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी सक्रिय सहभाग नोंदवून एस.आय.आर. मॅपिंगची प्रक्रिया प्रभावीपणे पूर्ण केली.

या उपक्रमाला मुरुड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे शिबिराला विशेष यश लाभले. या शिबिराद्वारे मतदार नोंदणी, माहिती अद्ययावत करणे आणि निवडणूक प्रक्रियेशी संबंधित आवश्यक बाबींबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जमातुल मुस्लिमीन मोहल्ला बाजारचे अध्यक्ष राशीद फहीम, उपाध्यक्ष मुसव्वीर जमादार,सचिव मुसद्दिक कादिरी, उपसचिव नबील संभुलखानी, खजिनदार मोईन दामाद, जाहिद फकजी, मौलाना मेहमूद उलडे व इतर पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. अंजुमन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. फिरोज शेख व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.स्थानिक प्रशासन, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांच्या समन्वयातून आयोजित करण्यात आलेले हे शिबिर नागरिकांमध्ये लोकशाही प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करणारे ठरले,

## आजपासून सुगंधी अंगण अभियानाचा शुभारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छतेत आघाडीवर असलेल्या नवी मुंबईला आता 'सुगंधी शहर' बनवण्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली व नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने सुंदर माझे अंगण, सुगंधी माझे शहर या अभियानास वाशी गावातून १५ एप्रिल सायंकाळी ५ वा पासून शुभारंभ होत आहे.

वाशीगावच्या पारंपरिक गावदेवी जत्रोत्सव पालखी सोहळ्याचे औचित्य साधून सुगंधी अंगण अभियान या लोकचळवळीची सुरुवात वाशी गाव येथील महाभारत मार्ग, मच्छी मार्केट ठिकाणापासून करण्यात येणार आहे. या अभियानास नवी मुंबई महापालिकेचे सभागृह नेते सागर नाईक , नगरसेवक निशांत भगत, नगरसेविका प्रीती भगत,नवी मुंबई मनपा अधिकारी,आजी – माजी नगरसेवक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

# नमुंमपा अग्निशमन दलामार्फत शहीद जवानांना आदरांजली अर्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

आपल्या जीवाची पर्वा न करता इतरांचे जीव वाचविण्यासाठी अग्निशमनाचे कार्य करणाऱ्या जवानांच्या कार्यतत्परतेला व सेवाभावाला सलाम करीत आपले कर्तव्य बजावताना प्राणांचे बलिदान करणाऱ्या अग्निशमन जवानांना नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी आदरांजली अर्पण केली.

नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन दलाच्या वतीने वाशी अग्निशमन केंद्रात अग्निशमन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी महापौर सुजाता पाटील यांनी शहीद अग्निशमन जवानांच्या स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण आदरांजली अर्पण केली आणि उपस्थित अग्निशमन जवानांशी संवाद साधला. याप्रसंगी आयुक्त डॉ,कैलास



शिंदे, नगरसेविका अंजली वाळुंज, मुख्य अग्निशमन अधिकारी तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, उपमुख्य अग्निशमन अधिकारी पुरूषोत्तम जाधव, विभागीय अग्निशमन अधिकारी गजेंद्र सुसविरकर यांनीही पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली अर्पण केली.

याप्रसंगी बोलताना आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अग्निविमचनाचे काम करताना शहीद झालेल्या जवानांना आदरांजली अर्पण करीत अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठीची खबरदारी घेण्याचा संदेश अंगिकारण्यासाठी अग्निशमन सेवा दिन महत्वाचा असल्याचे सांगितले. नवी मुंबईत आता बहुमजली उंच इमारती उभ्या रहात असून यापुढील काळात आपल्यापुढील आव्हाने मोठी असल्याचे सांगत फायर ऑडिट नियमित करणे, त्याची तपासणी करणे, नियमितपणे मॉक ड्रील घेणे, नागरिकांमध्ये जागरूकता आणणे, विशेषत्वाने सोसायट्यांमध्ये वा रस्त्यावर अग्निशमनाचे वाहन जाण्यास अडथळा होईल अशाप्रकारे रहिवाश्यांनी वाहने पार्कींग करण्याचे टाळणे या गोष्टींकडे प्राधान्याने लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या.


१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये एस एस फोर्ट स्टिकीन या जहाजाला लागलेल्या आगीत मुंबई अग्निशमन दलातील ६६ जवानांनी स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन अग्निविमोचनाचे कार्य केले. या शहीद जवानांना तसेच त्यानंतरही अग्नीविमोचनाचे कार्य करताना आपल्या प्राणांचे बलिदान दिलेल्या शहीद जवानांना भावपूर्ण अभिवादन करीत १४ एप्रिल हा दिवस 'अग्निशमन सेवा दिन' म्हणून देशभरात पालन करण्यात येतो.

या दिनाचे औचित्य साधून १४ ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत संपूर्ण नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात येत असून या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील मॉल्स, मोठ्या सोसायट्या, हॉस्पिटल्स, शाळा,महाविद्यालये,हॉटेल्स, रेल्वे स्टेशन अशा ठिकाणी अग्निसुरक्षतेच्या दृष्टिकोनातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे तसेच विविध ठिकाणी मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले आहे. प्रात्यक्षिकांसह होणारे हे उपक्रम जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत व विशेषत्वाने विद्यार्थी, युवकांपर्यंत पोहचविले जाणार आहेत.

**पान १ वरुन**

## महामानवाला अभिवादन!

यानंतर लेझीम, ढोल-बॅण्ड पथकाच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित तीन चित्ररथ तयार करण्यात आले होते. मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले लेझीम पथके. या



मिरवणुकीत एकूण १७ लेझिम पथकांनी सहभाग घेतला. मिरवणुकीचा समारोप आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ करण्यात आला. यानंतर पुढील कार्यक्रम नाट्यगृहात झाला.

यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, अनेक क्रांतिकारक बदल या देशात होत आहेत, ज्यांचे बीज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानात आहे. त्यांनी दिलेली उद्देशिका केवळ वाचून चालणार नाही, तर त्यातला शब्द न शब्द मनावर कोरला पाहिजे. ती आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

आपल्या मनोगतात महापौर नितीन पाटील म्हणाले की, पनवेल महापालिकेतर्फे आज काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा जागर केला आहे. या मिरवणुकीच्या माध्यमातून मिळालेली ऊर्जा आपल्या पुढील जीवनासाठी आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.


यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील नाटिका सादर करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी केले तसेच त्यांनी उद्देशिका शपथ दिली. परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या निमित्ताने घेण्यात आलेल्या निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ १ मे बुद्ध पौर्णिमेनिमित्ताने फडके नाट्यगृहात घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

# खोट्या आमिषाला बळी पडून मेहनतीने कमविलेले पैसे वाया घालवू नका!

## खालापूरचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचे आवाहन

**चौक, खालापूर : प्रतिनिधी**

चौक खालापूर परिसरात खोटे आमिष दाखवून, पैसे दुप्पट करून देणे, महागडी भेट वस्तू देणे, परतावा चांगला देतो असे खोटे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक चौक खालापूर परिसरात घडली आहे, अशा लोकांपासून सावध रहावे असे आवाहन खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले आहे.




चौक खालापूर परिसरात असा गुन्हा करणाऱ्या श्रीमती श्वेता अभिषेक प्रभू, देवेन्द्र चंद्रकांत सरदार ,पंकज अशोक शाह ,आकाश बळीराम पाटील यांना अटक करून न्यायालयात हजर केल्यावर २२ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. आज पाचवा आरोपी प्रसाद याला अटक करण्यात आली असून उद्या न्यायायात हजर करण्यात येणार आहे.

यांतील आरोपीत यांनी सावी कन्सलटन्सी इंटरप्रायजेस व स्वामीश कन्सलटन्सी प्रा.ली. या नावाने नोंदणी प्रमाणपत्र मिळवून चौक व खालापूर येथे कार्यालय उघडून त्यांना नागरिकांकडून ठेव स्वरूपात रक्कम स्विकारण्याचा अधिकार नसताना गुंतविलेल्या रकमेवर १७ महिन्यांसाठी गुंतवणूक रकमेवर ०६ टक्के व्याज व मुळ गुंतवणूक केलेली ०६ टक्के रक्कम अशी एकूण १२ टक्के रक्कम परतावा देण्याचे अमिष कंपनीच्या एजंट मार्फत सर्वसामान्य नागरिकांकडून दाखवून नागरिकांडून ठेव स्वरूपात १६,७५,०००/– रक्कम स्विकारून गुंतवणूक दारांना त्यांचे पैसे परत न देता त्यांची फसवणूक केली.

रायगड पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशान्वये वरील प्रमाणे गुन्हा दाखल झालेनंतर तात्काळ तपास पथके रवाना करून यांतील आरोपीत श्रीमती स्वेता प्रभू, देवेन्द्र सरदार, पंकज शाह, आकाश पाटील यांचा शोध घेवून यांना काल अटक करून त्यांना अति. सत्र न्यायालय पनवेल येथे पोलीस रिमांडसोबत हजर त्यांची दिनांक २२ एप्रिल पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांना आहवान करण्यात येते की, ज्या नागरिकांची सावी कन्सलटन्सी इंटरप्रायजेस चौक ता. खालापूर व स्वामीश कन्सलटन्सी खालापूर यांनी आर्थिक फसवणुक केली आहे अशा नागरिकांनी खालापूर पोलीस ठाणेत तसेच रायगड दृष्टी व्हॉटसप ॲप, ७६२००३२९३१, जनसपर्क अधिकारी, रायगड अलिबाग, नियंत्रण कक्ष रायगड अलिबाग येथे कॉल करून किंवा समक्ष भेटून देण्यात तक्रार नोंद यावी. असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी नवी मुंबई पालिकेकडून अभिवादन




**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे व राजेश पवार आणि तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### दुखवटा

**मकबूल डाभिया**



**कर्जत :** शहरातील प्रसिद्ध हार्डवेअरचे व्यापारी मकबूल अब्बासभाई डाभिया यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. माजी नगरसेवक व कोकण ज्ञानपीठ शैक्षणिक संस्थेचे खजिनदार झूलकरनैना डाभिया यांचे ते लहान बंधू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक पुत्र, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला.

भाजपचे राज्य परिषद सदस्य व ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, पनवेल शहर मंडल अध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंझारराव, नगरसेवक अजय बहिरा, रूपेश नागवेकर, हेमंत माने, सचिन दिसले, अशोक आंबेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपस्थितांनी बाबासाहेबांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व घटनात्मक योगदानाची आठवण करून दिली.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजातील सर्व घटकांच्या प्रगतीसाठी कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच त्यांच्या समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी बाबासाहेबांचा जयजयकार जयघोष करण्यात आला.

## उलवे येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रात महामानवाला अभिवादन



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

येथील सेक्टर १७ मधील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे अध्यक्ष शेखर देशमुख व ज्येष्ठ सदस्य कचरू मोरे यांच्या शुभहस्ते अनुक्रमे छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून पूजन करण्यात आले.

यावेळी केंद्राचे समर्थक सागर रंधवे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक महत्त्वपूर्ण प्रसंग विशद करून बाबासाहेबांच्या विचारांची आज समाजाला आणि देशाला गरज असल्याचे प्रतिपादन करून घटनेच्या सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या बाबासाहेबांच्या भूमिकेचे विश्लेषण करून देशात सामाजिक न्याय,स्वातंत्र्य,समता व बंधुत्व प्रस्थापित करण्यामध्ये राज्य घटनेने आज समाजाची एकी व देशाची अखंडता टिकून असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

कट्टयाचे अध्यक्ष शेखर देशमुख यांनीही आपल्या भावना व्यक्त करून शुभेच्छा दिल्या तर सचिव गोरख कांबळे यांनी त्रिशूल व पंचशील उच्चारण करून त्याचप्रमाणे गोरख कांबळे यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील काही महत्त्वाचे प्रसंग विशद केले.

ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राच्या वतीने यावेळी मिठाई आणि अल्पोपहार वितरीत करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज तसेच महात्मा फुले व इतर महामानवांचा जयघोष करत जयंती समारंभ अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी केंद्राचे अध्यक्ष शेखर देशमुख, उपाध्यक्ष तात्यासाहेब कोडग, जानू जाधव, पद्माकर कोळी, सचिव गोरख कांबळे, खंडू रोडे, महादेव मतकर, प्रकाश ठोंबरे, अशोक नेहते, नितीन ठक्कर, प्रा.राम म्हात्रे, मधुकर दुडे, कचरू मोरे, शांताराम कोळी, अशोक कळके, शिंदे, कोंडीबा दुंदळे, जितेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, अविनाश कजबजे, विलास तायडे, शरद चौधरी, हरिश्चंद्र भगत, संतोष डोके, श्रीराम साहू, विजय वाघाडे, चंद्रकांत राणे, गणेश मदने व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, खारघर येथे १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रम बोर्ड रूम येथे पार पडला.

सर्वप्रथम महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले. त्या पुढे बोलताना म्हणाल्या की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे महान विचारवंत, भारतीय संविधानाचे निर्माते, कायदे पंडित, होते त्याचबरोबर त्यांनी महिलाना समान न्याय, हक्क याची जाणीव करून दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय आणि शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या प्रमुख मुद्यावर सखोल भाष्य केले. सदर कार्यक्रम यशस्वी पार करण्यासाठी ग्रंथालय समिती सर्व सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी मोलाचे योगदान दिले. शेवटी आभार वैभव झगडे यांनी मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

**नवीन पनवेल : आनंद ज्येष्ठ नागरिक संघ नवीन पनवेल आणि संत रोहिदास विकास मंडळ यांचे वतीने आज ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र नवीन पनवेल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. यावेळी किसन पवार, विनायक माने, सुरेश पुगावकर, विजय गोरेगावकर, क्रिश्ना अंबोकर, संजय गुजर, दीपक भिवाडकर, गिरीश चांदरकर आदी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.**





**कळंबोली : भाजप कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मंडळ अध्यक्ष व नगरसेवक अमर पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महामानवाला अभिवादन केले.**

## एमएनएम विद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय संविधानाचे शिल्पकार थोर समाज सुधारक, अर्थतज्ज्ञ कायदेतज्ञ, डॉ. भीमराव रावजी आंबेडकर जयंती जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील एमएनएम विद्यालयात साजरी करण्यात आली.

यावेळी शाळेच्या प्राचार्या सायली वडवलकर यांनी महामानव डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले.




## करंजाडे, वडघर परिसरात डॉ. आंबेडकर जयंतीचा उत्साह



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभेतील करंजाडे व वडघर परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वडघर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, साई वृंदावन को-ऑपरेटिव्ह सोसायटी तसेच करंजाडे येथील महाबोधी बुद्ध विहार विपश्यना केंद्र येथे सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक उपक्रम पार पडले.

या निमित्ताने मंगळवारी आमदार महेश बालदी यांनी विविध ठिकाणी भेट देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे समाजासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्या सोनालीताई जितेकर, जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक गणेश कडू, करंजाडे सरपंच मंगेश शेलार, मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, उपसरपंच सागरभाई आंग्रे, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, वडघर विभागीय अध्यक्ष समीर केणी, गजानन पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य सुनील भोईर, नंदू भोईर, बिपिन गायकवाड, अतिश साबळे, कैलास शेलार, अजय साबळे आणि गणेश कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमांमुळे परिसरात सामाजिक एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.



**पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करत सामाजिक समता, बंधूता आणि न्याय या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.**

## जेएनपीएत बंदर व गोदी कामगार नेत्यांची बैठक




**उरण : वार्ताहर**

अखिल भारतीय बंदर आणि गोदी कामगारांच्या राष्ट्रीय समन्वय समितीची बैठक ज्येष्ठ कामगार नेते एस.के. शेट्टे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी जेएनपीएच्या विश्रामगृहात पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने बंदर कामगारांच्या वेतन आणि बोनस,बढती तसेच भविष्य निर्वाह निधीतील वाढ या मागण्यांवर सरकार आणि बंदर प्रशासनाने लवकरात निर्णय घेण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

या बैठकीसाठी देशातील अकरा बंदरातील पाच बंदर कामगार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जेएनपीएचे कामगार नेते व B.M.S. चे राष्ट्रीय महासचिव सुरेश पाटील, विश्वस्त दिनेश पाटील,रवींद्र पाटील, माजी विश्वस्त कॉ. भूषण पाटील, कामगार नेते सुधीर घरत, गणेश घरत आदीजन उपस्थित होते. बंदर विभागाकडून २०२० -२१ ते २०२५-३६ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी लागू होणारा बोनस करार मंजूर करण्यात आला आहे. मात्र त्याची अंमलबजावणी केली जात नाही. यामध्ये उचल वजा करून उर्वरित रक्कम संबंधितांना परत देण्याचेही मान्य करण्यात आले आहे.

या बैठकीला भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ,ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन, इंडिया फोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन, वॉटर ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन ऑफ इंडिया, इंडियन नॅशनल पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन, पोर्ट डॉक अँड वॉटर फ्रंट फेडरेशन ऑफ इंडिया यांचे नेते उपस्थित होते.

## पनवेलमध्ये रंगला चैत्रगौर हळदीकुंकू सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नाच ग घुमा ग्रुप आणि स्व. सौ. मुग्धा लोंढे सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चैत्रगौर हळदीकुंकू सोहळा अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात पार पडला. सोमवारी (दि.१३) पनवेलमधील रामदास मारुती मंदिर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यास परिसरातील मान्यवर नगरसेविका तसेच अनेक सक्रेी भगिनींची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. महिलांनी मोठ्या आनंदाने सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमात चैत्रगौरीची आकर्षक व देखणी आरास करण्यात आली होती. दोन हत्तींच्या सोंडेतील झोपाळ्यात विराजमान चैत्रगौर ही सजावट विशेष लक्षवेधी ठरली. फुलं-पानांचा साज आणि निसर्गाची साथ यामुळे संपूर्ण वातावरण अधिक प्रसन्न झाले.

यावेळी पारंपरिक डाळ व पन्ह्याचा आस्वाद घेत उपस्थितांनी सोहळ्याचा आनंद लुटला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते धारप काकू यांचे मार्गदर्शन. त्यांनी चैत्रगौरीचे धार्मिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्त्व अतिशय सोप्या आणि प्रभावी शब्दांत उलगडून सांगितले. या सोहळ्यामुळे सर्व महिलांना एकत्र येण्याची संधी मिळाली असून परस्परांतील नात्यांचा गोडवा अधिक वृद्धिंगत झाला आणि आनंद द्विगुणित झाला.

जिथे संस्कृती, तिथे एकता; आणि जिथे एकता, तिथेच खरा आनंद! या सुविचाराची प्रचिती देणारा हा कार्यक्रम ठरला. यावेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, नगरसेविका दर्शना भाईर तसेच भाजप महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा रुचिता लोंढे यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## संपादकीय

# योगक्षेमं वहाम्यहम्

सामान्य माणूस हा विकासाचा केंद्रबिंदू असला पाहिजे या भावनेतून विकासाचे आराखडे तयार केले जात आहेत, आणि विकासाचे वारे गावोगावी पोहोचून त्याचा आनंद सामान्य माणसाला अनुभवता येतो आहे. याच नीतीचा एक पुढचा टप्पा महाराष्ट्रात आकाराला येत आहे.

**कोणत्याही विकासाची एक नीती असते. ज्या विकासामुळे समाजाच्या अखेरच्या स्तरावरील प्रत्येक माणसाचे जीवनमान उंचावेल व ज्यामुळे अशी अनेक कुटुंबे विकासाच्या फायद्याचे प्रत्यक्ष लाभार्थी होऊन त्यांच्या मानसिकतेतील अभावग्रस्ततेची भावना दूर होईल असा विकास हा स्थायी विकास असतो. केवळ उत्तम दर्जाचे रस्ते बांधणे, पूल उभारणे, शहरांचा चेहरामोहरा झगमगाटी करणे किंवा जागतिक दर्जाची उत्पादने करणारे उद्योग स्थापन करणे म्हणजे विकास नव्हे. हे विकासाचे बाह्य रूप असते. या विकासामुळे जेव्हा रोजगाराच्या संधी निर्माण होतात, सामान्य माणसाच्या हाताला काम मिळून हाती पुरेसा पैसा खुळखुळू लागतो व विकासामुळे बाजारपेठांमध्ये उपलब्ध असलेली जीवनशैली उंचावणारी साधने विकत घेण्याची क्षमता प्रत्येक सामान्य माणसाच्या अंगी निर्माण होते, तेव्हा ते विकासाचे खरे रूप असते. थोडक्यात, विकास हा सामाजिकदृष्ट्या सर्वसमावेशक असावयास हवा, आणि त्याचा लाभ समान प्रमाणात सर्वांस मिळावयास हवा. गेल्या पाऊणशे वर्षांत भारतात विकास झालाच नाही असे नाही. तथापि, या विकासाची सर्व फळे सर्वांना सारख्याच प्रमाणात चाखावयास मिळाली असेही दिसत नाही. देशातील अनेक समाजघटक त्या विकासापासून वर्षानुवर्षे वंचित राहिले. एकीकडे महामार्गांनी महानगरे जोडली जात असताना, अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या ग्रामीण भागांत साधे रस्तेदेखील पोहोचले नव्हते. शहरे अखंड विजेच्या झगमगाटात न्हाऊन निघत असताना, खेडोपाडीच्या घरांमध्ये कंदील पेटवण्यासाठी पुरेसे घासलेटही मिळत नव्हते. यामुळेच देशात आर्थिक स्तरांमध्ये समाजाची विभागणी झाली आणि आहे रे व नाही रे असा एक वर्गसंघर्षही सुरू झाला. सामाजिक न्यायासाठी संघर्ष करणाऱ्यांनी या समस्येच्या विरोधात आवाज उठविला असला तरी व्यवस्थेची संवेदनशीलता मात्र त्यास साथ देत नव्हती. गेल्या बारा वर्षांत हे चित्र बदलताना दिसते आहे. वातावरणात होत असलेल्या बदलामुळे देशात उष्णतेचं प्रभाव असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांचे व मृत्यूचेही प्रमाण वाढत असल्याने, भविष्यात या संकटाचे रूप अधिक गडद होणार हे लक्षात घेऊन महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस सरकारने एक अनोखा कार्यक्रम हाती घेतला आहे. राज्यातील उच्च उष्णतेचा धोका असलेल्या जिल्ह्यांमध्ये उष्णता प्रतिबंधक गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्याचा राज्य सरकारचा निर्णय भविष्यात ग्रामीण महाराष्ट्रासाठी वरदान ठरणार आहे. उष्णतेचा धोका कमी करण्यासाठी, औष्णिक आराम देणारी व हवामानास अनुकूल अशी घरे उभारण्यास या योजनेतून प्रोत्साहन दिले जाणार आहे. उष्णतेचा सर्वाधिक धोका असलेल्या १५ जिल्ह्यांना ही योजना लागू होणार असल्याने, झोपडपट्ट्या, तात्पुरती घरे, कामगार वसाहती, आदी सर्वसामान्यांच्या निवासस्थानांस उष्णतावाढीच्या त्रासातून दिलासा मिळणार आहे. या उपायांमुळे उष्णतेचा धोका लवकर ओळखून हानी पोहोचेल अशा लोकांचे संरक्षण करण्याच्या योजनांची तत्पर अंमलबजावणी करण्यात येईल. सामान्यांच्या हिताच्या अशा योजनांना विकासाचा झगझगीत चेहरामोहरा नसेल, पण त्यांची फळे मात्र या घराघरांना चाखावयास मिळतील. अखेर, जीवनमान सुसह्य होण्यासाठी जे जे काही करावे लागेल ते करणे म्हणजे विकास असेल, तर ही योजना म्हणजे विकासाचे विशेष मॉडेल आहे असे म्हणता येईल.**

# अष्टावधानी पद्मविभूषण आशाताई



आपल्या महाराष्ट्राच्या कलाक्षेत्रातील एक अनमोल रत्न महाराष्ट्र भूषण, पद्मविभूषण आशाताई भोसले हे महाराष्ट्राला पडलेले सुरेल गोड स्वप्न. १२ तारखेस त्या स्व. लतादिदींना भेटण्यासाठी अचानक निघून गेल्या. संपूर्ण महाराष्ट्र आणि तमाम संगीतप्रेमींवर दुःखाचा डोंगर कोसळला. स्व.लतादिदी आणि त्यांच्या परलोकगमनात एक साम्य म्हणजे रविवार आणि वय वर्ष ९२. एक विलक्षण योगायोग. या ९२वरून आठवले की, १९९२ या वर्षी त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी आशाताईंना प्रत्यक्ष 'प्रभुकुंज'वर जाऊन शुभेच्छा देण्याचे भाग्य मला लाभले. त्यावेळी मी एका वृत्तपत्रात उपसंपादक/सिनेपुरवणी प्रमुख म्हणून काम करत होतो. या वृत्तपत्राच्या आशाताईंवरील विशेष सिनेपुरवणीचे प्रकाशन त्यांच्याच हस्ते 'प्रभूकुंज'वर ठरले. माझे मित्र सुरेश देशमाने आणि ज्येष्ठ संगीतकार स्व.अनिल मोहिले यांच्यामार्फत हा योग जुळून आला होता. त्यावेळेस खूपच छान अनुभव आला.

लतादिदी, आशाताई आणि पं. हृदयनाथ यांचे फ्लॅट एकाच मजल्यावर असून ते एकमेकांना अंतर्गत जोडले आहेत. त्या दिवशी अर्थातच त्यांच्या चाहत्यांनी दिलेले पुष्पगुच्छ घरभर होते. आम्हाला दिलेल्या वेळेप्रमाणे मी व तत्कालीन फोटोग्राफर आताचे ज्येष्ठ कॅमेरामन सुरेश देशमाने आम्ही त्यांच्या घरी गेलो, पुरवणीचे प्रकाशन केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या. अतिशय अत्मियतेने त्यांनी आमची चौकशी केली आणि शुभेच्छांचा स्वीकार केला. एवढ्या मोठ्या गायिका असूनही त्यांनी दिलेली वेळ आणि केलेले आदरातिथ्य ग्रेटच. आशाताईंनी विविध ढंगाची विविध प्रकारची गाणी गायलीत. आईए मेहरबान (हावडा ब्रीज), अभी ना जाओ छोडकर (हम दोनो), इन आँखो की मस्ती के (उमराव जान), दम मारो दम (हे रामा हरे कृष्णा), ये मेरा दिल (डॉन), पिया तु अब तो आजा (कारवाँ), परदे में रहने दो (शिकार), चुरा लिया हे तुमने (यादो की बारात), आओ ना गले लगा लो ना (मेरा जीवन साथी), ये लडका हाये अल्ला (हम किसीसे कम नहीं) ही काही वैविध्यपूर्ण गाणी प्रातिनिधीक स्वरुपात आहेत.


असाच आणखी एक प्रसंग मला अनुभवयास मिळाला तो होता डॉ. जब्बार पटेल यांच्या एक होता विदूषक या चित्रपटातील एका गाण्याच्या रेकॉर्डिंगचा. मला वाटते ताडदेव भागातील एका फेमस स्टुडिओमध्ये याचे रेकॉर्डिंग होते. आशाताई येणार म्हटल्यानंतर आम्ही थोडे लवकरच पोहचलो. अर्थातच, तेथील वातावरण एकदम उत्साही होते. डॉ. जब्बार पटेल स्वतः सर्व व्यवस्था पाहत होते आणि काही वेळात आशाताई आल्या. त्यांनी जब्बार सरांशी प्राथमिक चर्चा केली. संगीतकार आनंद मोडक त्यावेळी होते.

कविवर्य ना.धों. महानोर यांनी शब्दबद्ध केलेले भरलं आभाळं पावसाळी पाहूणा ग.. बाई श्रावणाचं ऊन मला झेपेना..पिवळया पंखांचा पक्षी नाव सांगेना ग.. बाई श्रावणाचं ऊन मला झेपेना ही लावणी त्यांनी सहजतेने गायली आणि रेकॉर्डिंग झाले. निःशब्द असलेल्या स्टुडिओत टाळ्यांचा कडकडाट झाला. क्या बात है.. सारेगमपा लिटील चॅम्पस या शोमध्ये आशाताई जज-परीक्षक म्हणून होत्या. त्यावेळेस त्यांच्यावरील गाण्याच्या कार्यक्रमांमध्ये एका छोट्या मुलीने एक सुरेख गीत गायले. आशाताईंनी त्या मुलीचे खूप कौतुक केले. तिला बोलावून, आपल्याजवळ बसवून दोन्ही हातांनी तिची वेणी घातली. तसेच तिला हेदेखील सांगितले की, लतादिदीसुद्धा माझी अशाच प्रकारे वेणी घालायची. या वेणीमध्ये तू छान दिसतेस. कसला गोड व भावपूर्ण असा तो अविस्मरणीय प्रसंग. आशाताई आपण थोर गायिका तर आहातच, पण त्याहूनही थोर अशा आपण मोठ्या कुटुंबवत्सल माताही आहात, हे त्या प्रसंगातून जाणवले. या कार्यक्रमात प्रसंगी आनंदाने या गायकांबरोबर गाणी गाणे, नृत्य करणे काही वेळा लतादिदींची हुबेहुब नक्कल करत त्यांच्या वेळेसचे किस्से, गोष्टी सांगणे अशा कितीतरी आगळ्यावेगळ्या प्रकारचे मनोरंजन आपण या वयातही करीत होत्या. खरोखरच त्या उत्साहास सलाम. 'उत्सव' हा रेखाजींचा चित्रपट... यातील दिदी आणि आशाताई यांनी गायलेले मन क्यू बहका रे, बहका हे गीत आशाताई व दिदींच्या चाहत्यांना एक प्रकारची मेजवानीच.

मास्टर दिनानाथांच्या गाण्याचा वारसा, लतादिदी आणि पं. हृदयनाथ ही भावंडे त्यांचे पाठबळ आणि स्वतःची अविरत अशी मेहनत या भक्कम पार्श्वभूमीवर आशाताईंनी केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगभरातील चाहत्यांच्या मनावर राज्य केले आहे. असे कोणतेही गीत, कोणतेही भाषा नसेल जे त्या गाऊ शकत नाहीत. खरोखर आशाताईंच्या १९५० ते २०२६ या ७६ वर्षात प्रदीर्घ अशा गायकीच्या कारकीर्दीस सलाम..१४ भाषा, ९००पेक्षा अधिक चित्रपट आणि १२ हजारांवर गाणी, मराठी, हिंदी, कोकणी, नेपाळी. सर्व प्रकारे गीते, शास्त्रीय, मराठी, डिस्को, रॅप, पॉप, नाट्यगीत, लावण्या, गझल, अशी सर्वच प्रकारची संगीतमय सफर असलेल्या स्व. आशाताईंस भावपूर्ण श्रद्धांजली.

**-डॉ. राजू पाटोदकर,**
**ज्येष्ठ सिनेअभ्यासक**

# गीतकार हसरत जयपुरी



गीतकार हसरत जयपुरी (१५ एप्रिल १९२२ -१७ सप्टेंबर १९९९), हे एक भारतीय कवी होते, ज्यांनी हिंदी आणि उर्दू भाषांमध्ये लेखन केले. ते हिंदी चित्रपटांमधील एक प्रसिद्ध गीतकारदेखील होते , जिथे त्यांनी १९६६ आणि १९७२मध्ये दोनदा सर्वोत्कृष्ट गीतकारासाठी फिल्मफेअर पुरस्कार जिंकला होता

जयपुरी यांचा जन्म जयपूरमध्ये इक्बाल हुसेन म्हणून झाला. जिथे त्यांनी मध्यम स्तरापर्यंत इंग्रजीमध्ये शिक्षण घेतले आणि नंतर त्यांचे आजोबा, कवी फिदा हुसेन 'फिदा' यांच्याकडून उर्दू आणि फारसीमध्ये तालीम (शिक्षण) घेतले. त्यांनी वयाच्या सुमारे विसाव्या वर्षी कविता लिहायला सुरुवात केली. त्याच सुमारास, ते त्यांच्या शेजारी राहणाऱ्या राधा नावाच्या मुलीच्या प्रेमात पडले. हसरत यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात एका मुलाखतीत, त्या मुलीला लिहिलेल्या प्रेमपत्राबद्दल सांगितले की, प्रेमाला कोणताही धर्म नसतो. हसरत जयपुरी यांच्या हवाल्याने असे म्हटले जाते की, "एका मुस्लिम मुलाने फक्त मुस्लिम मुलीच्याच प्रेमात पडावे हे अजिबात आवश्यक नाही. माझे प्रेम निःशब्द होते, पण मी तिच्यासाठी एक कविता लिहिली, 'ये मेरा प्रेम पत्र पढ कर, के तुम नाराज न होना.'" हे प्रेमपत्र प्रत्यक्षात राधापर्यंत पोहोचले की नाही हे अनिश्चित आहे. पण ज्येष्ठ चित्रपट निर्माते राज कपूर यांना ते इतके आवडले की त्यांनी त्याचा समावेश त्यांच्या संगम (१९६४ चा हिंदी चित्रपट) मध्ये केला आणि ते गाणे भारतात 'हिट' गाणे ठरले.

१९४० मध्ये, जयपुरी बॉम्बे (आता मुंबई ) येथे आले आणि बस कंडक्टर म्हणून काम करू लागले , त्यांना दरमहा अकरा रुपये पगार मिळत होता. ते मुशायऱ्यांमध्ये , किंवा काव्यवाचन संमेलनांमध्ये भाग घेत असत . एका मुशायऱ्यात , पृथ्वीराज कपूर यांनी जयपुरी यांना पाहिले आणि त्यांचे पुत्र राज कपूर यांच्याकडे त्यांची शिफारस केली. राज कपूर शंकर-जयकिशन यांच्यासोबत ' बरसात ' (१९४९) या संगीतमय प्रेमकथेची योजना आखत होते . जयपुरी यांनी या चित्रपटासाठी त्यांचे पहिले रेकॉर्ड केलेले गाणे, 'जिया बेकरार है' लिहिले . त्यांचे दुसरे गाणे (आणि पहिले युगलगीत) 'छोर गये बालम' होते. जयपुरी यांनी त्यांच्या पत्नीच्या सल्ल्यानुसार आपली कमाई रिअल इस्टेट किंवा भाड्याच्या मालमत्तेत गुंतवली. या मालमत्तांमधून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे त्यांची आर्थिक स्थिती चांगली होती आणि त्यामुळे ते गीतकार म्हणून आपला वेळ देऊ शकले.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### ऑनलाइन पेमेंटसाठी ओटीपीची गरज संपेल

देशातील मोठ्या खासगी बँका आणि दूरसंचार कंपन्या 'सायलेंट ऑथेंटिकेशन' तंत्रज्ञानावर काम करत आहेत. यामुळे ऑनलाइन पेमेंट करताना वन-टाइम पासवर्ड (OTP) ची गरज संपेल. ही प्रणाली बॅकग्राउंडमध्येच तपासणी करेल की बँक अॅपमध्ये नोंदणीकृत नंबर आणि फोनचे सिम कार्ड जुळत आहेत की नाही.




जर सिम आणि नंबर जुळले नाहीत, तर व्यवहार त्वरित ब्लॉक केला जाईल. विशेष बाब म्हणजे यात वापरकर्त्याला काहीही करण्याची गरज भासणार नाही. हे तंत्रज्ञान ई-सिम (eSIM) वर देखील काम करेल. यामुळे सिम क्लोनिंग आणि ई-सिम स्वॅपसारखे फसवणूक थांबतील. ही माहिती अॅक्सिस बँकेचे डिजिटल बिझनेस हेड समीर शेट्टी यांनी दिली.

ऑनलाइन फसवणूक रोखण्यास मदत होईल

शेट्टी म्हणाले, 'आम्ही टेलिकॉम कंपन्यांसोबत मिळून सायलेंट ऑथेंटिकेशनच्या अनेक पायलट प्रोजेक्ट्सवर काम करत आहोत. जर एखादी व्यक्ती अॅपमध्ये लॉग-इन असेल, पण तिचा मोबाईल नंबर नोंदणीकृत नंबरशी जुळत नसेल, तर टेलिकॉम नेटवर्क आम्हाला याचा सिग्नल देईल. यामुळे आम्ही ग्राहकाला त्रास न देता संभाव्य फसवणूक शोधू शकू.'

सिस्टम बॅकग्राउंडमध्ये काम करेल

PWC इंडियाचे सायबर लीडर सुंदरेश्वर कृष्णमूर्ती यांच्या मते, आतापर्यंत सुरक्षेचे स्तर असे होते, जे सहज हॅक केले जाऊ शकत होते. आता बँका आणि टेलिकॉम कंपन्या नेटवर्कच्या मुख्य भागातच पडताळणी (व्हेरिफिकेशन) स्थलांतरित करत आहेत.ही प्रणाली बॅकग्राउंडमध्ये काम करेल, जी वापरकर्ता किंवा हॅकर पाहू शकणार नाहीत. सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी यात फेस आयडी आणि अॅपमध्येच कोड (OTP) जनरेट होण्यासारख्या सुविधादेखील जोडल्या जात आहेत.

RBIचे नवीन नियमः टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन आवश्यक

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (RBI) नवीन नियमांनुसार, आता देशातील सर्व डिजिटल व्यवहारांसाठी टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (२FA) अनिवार्य करण्यात आले आहे.यात पासवर्ड किंवा पिन OTP किंवा अॅप कोड आणि बायोमेट्रिक्स (जसे की चेहरा किंवा अंगठा) यांचा समावेश आहे.

# मराठीतील गझलसम्राट सुरेश भट



## निमित्त

सुरेश भट हे मराठी गझल विश्वातील एक अजरामर नाव. त्यांच्याशिवाय मराठी गझल हा विषयच पूर्ण होत नाही. गझल मराठी माणसांपर्यंत पोहचवली ती सुरेश भट यांनी. गझलचे सादरीकरणाचे वेगवेगळे कार्यक्रम करून त्यांनी गझलचा प्रसार आणि प्रचार केला. 'लाभले आम्हांस भाग्य' ही त्यांची गझल अनेक लोक म्हणतात, कतात. सुरेश भटांनी यांनी उर्दू भाषेतील शेर शायरी, गझल यांचा आयुष्यभर मनापासून आभ्यास केला. गझल हा काव्य-प्रकार मराठीत रुजवला. हा त्यांचा प्रयास त्यांना 'गझल सम्राट' हा मनाचा किताब देऊन गेला.

विदर्भातील अमरावती या शहरात सुरेश भटांचा जन्म १५ एप्रिल १९३२ रोजी झाला. तिथेच ते लहानाचे मोठे झाले. वडील डॉक्टर असल्याने घरची परिस्थिती बरी होती आणि त्यांच्या आईला कवितेची खूप आवड होती. यातूनच सुरेश भटांना कवितांची आवड निर्माण झाली. सुरेश भट यांना लहानपणीच मराठी कवितांची आवड निर्माण झाली. ते अडीच वर्षांचे असताना त्यांना पोलिओची बाधा झाली होती. त्यामुळे त्याचा उजवा पाय जन्मभरासाठी अधू झाला होता. त्यांचे सर्व शिक्षण अमरावती येथे झाले. बीए पास झाल्यानंतर ते शिक्षकी व्यवसायात आले. अमरावती जिल्ह्यात ग्रामीण भागात नोकरी करताना त्यांनी त्यांचे कविता लेखन सुरू ठेवले होते, पण ते काही लिहित होते ती गझल आहे हे त्यांनाही माहिती नव्हते. त्यांना उर्दू भाषेचाही चांगलाच अभ्यास होता. सुरेश भट हे जरी विदर्भातील असले तरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांची ओळख होती. हृदयनाथ मंगेशकर यांनी सुरेश भट यांना शोधून काढले आणि भटांच्या कविता, गझल त्यांनी संगीतबद्ध केल्या.

मराठीतील अनेक प्रसिद्ध सिनेमांमध्ये त्यांच्या गझल घेण्यात आल्या. सुरेश भटांनी एकूण पाच गझलसंग्रह लिहिले त्यात 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात', 'सप्तरंग' यांचा समावेश आहे. वेगवेगळे रस, रंग असणारी मराठी गझल त्यांनी रेखाटली. फक्त श्रृंगार, प्रेम, विरह इतकच नाहीतर त्यांनी आपल्या गझलमधून समाजाचे दुःख मांडले, राजकीय लोकांचा भ्रष्टाचार मांडला. बदलता समाज, बदलती माणूसकी मांडली. त्यांच्या अनेक गझल बीएच्या अभ्यासक्रमात घेण्यात आल्या.

माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य गझलसम्राट म्हणजे सुरेश भट असे वर्णन सुरेश भट यांचे करता येईल. आज त्यांच्यामुळे मराठी गझलला मानाचे स्थान मिळाले आहे. त्यांच्या गझल संग्रहांना आजही मोठी मागणी आहे. त्यांची गझल ही कोणत्याही एका वर्गाची नव्हती. अनेक साहित्यिकांनी गझलला मान्य केले नव्हते पण सुरेश भट लढले आणि त्यांनी गझलला अधिकत सन्मान मिळवून दिला. सुरेश भटांनी गझल फक्त त्यांच्यापुरतील मर्यादीत न ठेवता अनेकांना ती शिकवली. आज महाराष्ट्रात त्यांच्याकडून गझल शिकलेले कित्येक गझलकार आहेत.

सुरेश भट यांनी मराठी गझलच्या विश्वात अमूल्य असं काम केले होते. त्यांच्या गझल व कविता हृदयनाथ मंगेशकर, लता मंगेशकर, आशा भोसले, सुरेश वाडकर, भिमराव पांचाळे यांसारख्या अनेक मोठ्या गायकांनी गायल्या आहेत. १४ मार्च २००३ रोजी त्यांचे निधन झाले.

**-संजीव वेलणकर**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### बदलत्या वातावरणात करा आहारात बदल

उन्हाळ्यात तापमानात लक्षणीय वाढ होते. अशा वातावरणात निरोगी राहण्यासाठी आहारात बदल करणे गरजेचे असते. उन्हाळ्यात हंगामी फळ आणि भाज्यांचा समावेश करावा.

यामुळे अनेक आजार दूर राहतात. उन्हाळ्यात हंगामी फळांचे सेवन करावे. यामुळे शरीराला योग्य पोषण मिळते आणि तुम्ही निरोगी राहता. उन्हाळ्यात शरीरात पाण्याची कमतरता जाणवू शकते. यामुळे टरबुज, कलिंगड, काकडी, संत्र, नारळ पाणी प्यावे.



उन्हाळ्यात तापमान जास्त असल्याने शरीरात पाण्याची कमतरता जाणवू शकते.

यामुळे आहारात लस्सी, नारळ पाणी, कोकम शरबत, लिंबू पाणीचे सेवन करावे. उन्हात बाहेर जात असाल तर बॅगमध्ये पाण्याची बाटली सोबत ठेवावी. यामुळे डिहायड्राशनची समस्या होणार नाही.

वयस्कर लोकांनी आहाराची खास काळजी घ्यावी. उन्हाळ्यात दूध, दही, रायता, ताक, अंडी आणि कडधान्यांचा आहारात समावेश करावा. तसेच विविध हंगामी फळांचे आणि हिरव्या भाज्यांचे सेवन करावे. रात्रीच्या जेवणात हलक्या पदार्थांचा समावेश करावा. यामुळे पचनसंस्था देखील निरोगी राहते.

या लोकांनी अंडी, मासे, दुग्धजन्य पदार्थ यासारख्या पदार्थांचे सेवन करू शकतात.

यामुळे त्यांच्या शरीरात प्रोटीनची कमतरता जाणवणार नाही. याशिवाय पौष्टिक घटकांचा पुरवठा करण्यासाठी हिरव्या पालेभाज्या आणि फळांचा समावेश करावा. तपकिरी तांदूळ, गहू आणि ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारखी इतर धान्यांमध्ये फायबर आणि जीवनसत्त्वांसाठी त्यांच्या आहारात समाविष्ट करणे सर्वात महत्वाचे आहे.

उन्हाळ्यात थंड दूध, ताक, लस्सी यासारख्या पदार्थांचा समावेश करावा. काम असेल तरच घराबाहेर जावे. उन्हाळ्यात लहान मुलांना आणि वयस्कर लोकांमध्ये डिहायड्रेशनची समस्या निर्माण होऊ शकते. यामुळे भरपूर पाणी आणि रसाळ फळांचा आहारात समावेश करावा.

उन्हाळ्यात मसालेदार पदार्थ खाणे टाळावे. तेलकट,शिळे पदार्थ खाणे टाळावे. पॅकेजिंग पदार्थ खाणे टाळावे. डिहाड्रेशनपासून बचाव करण्यासाठी चहा, कॉफी, यासारख्या पदार्थांचे सेवन करावे. अशा प्रकारे तुम्ही उन्हाळ्यात निरोगी राहू शकत

# माथेरानमध्ये पावसाळी पर्यटनात प्लास्टिक रेनकोट बंदी, पर्यटकांसाठी नवीन नियम लागू



**माथेरान : बातमीदार**

मुंबई पुण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या माथेरान पर्यटनस्थळी पावसाळ्यामध्ये प्लास्टिक रेनकोट वर बंदी घातली आहे.पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना पावसाळी प्लास्टिक रेनकोट वर पूर्णतः बंदी घातली आहे.पर्यावरणदृष्ट्या अतिसंवेदनशील अश्या माथेरान गिरीस्थानचे अबाधित राखण्यासाठी माथेरान नगरपरिषदेच्या पर्यावरण,पर्यटन व नियोजनसमितीच्या बैठकीत हा ठराव मंजूर करण्यात आला.

हिवाळा,पावसाळा किंवा अगदी उकाड्याच्या दिवसांमध्ये सुद्धा किमान दिलासा मिळावा आणि शहरी धकाधकीपासून थोडं दूर जाता यावं यासाठी बऱ्याच मंडळींचे पाय किमान अंतरावरील असलेल्या पर्यटनस्थळांकडे वळतात.मुंबई,पुण्यापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या या माथेरानमध्ये दरवर्षी मोठ्या संख्येनं पर्यटक येतात.ज्यामुळं माथेरान आणि नजीकच्या भागांमध्ये असणाऱ्या स्थानिकांना अर्थार्जनाच्याही संधी मिळतात.याच माथेरानमध्ये आता एक अतिशयमोठा नियम लागू करण्यात आला आहे.प्रामुख्यानं पावसाळ्यात माथेरानला भटकंती,ट्रेकिंग किंवा निवांत मुक्काम करण्यासाठी येणारे हजारो पर्यटक सोबत प्लास्टिक रेनकोट आणतात.अनेकचा परतीच्या प्रवासात हेच रेनकोट रस्त्यावर,दऱ्याखोऱ्यांत फेकले जातात हेच वास्तव असून या सवयीमुळं माथेरानमध्ये पर्यावरण संवर्धनाचा बोजवाराच उडाला होता.हेच प्लास्टिक रेनकोट फक्त माथेरानमध्येच नव्हे तर,नेरळ रेल्वे स्टेशन परिसरातही मोठ्या प्रमाणात टाकून दिले जात असल्याचं वास्तव समोर आलं,ज्यामुळं या निसर्गरम्य शहराचं विद्रुपीकरण होत होतं.याच परिस्थितीमुळे माथेरान मधील पर्यावरणाला हानी होत होती.ही हानी पाहता सदर प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे.ज्यामध्ये माथेरान नगर परिषदेने यापुढे प्लास्टिक रेनकोटवर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.यंदाच्याच वर्षापासून या नियमाची अंमलबजावणीसुद्धा केली जाणार आहे.

पर्यावरण,पर्यटन व नियोजन सभापती शिवाजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहात सोमवार दि.१३ रोजी या समितीची बैठक पार पडली.माथेरानमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांसाठी प्लॅस्टिक रेनकोटची विक्री केली जाते.मात्र वापरानंतर हे रेनकोट जंगलात टाकून दिल्यामुळे पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होत असल्याची बाब समोर आली होती.माथेरान हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील पर्यटनस्थळ असल्यान प्लॅस्टिकचा वापर पूर्णतः बंद करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून केली होती.या पार्श्वभूमीवर समितीने प्लॅस्टिक रेनकोटवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला.दरम्यान,महात्मा गांधी रोडवर मॉल रोडच्या धर्तीवर पर्यटकांसाठी बसण्याची सोय करण्याचाही निर्णय घेतला आहे.यामुळे बाजारपेठेचे सौंदर्य वाढण्यास मदत होईल

## वावोशी फाटा येथून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**खोपोली : प्रतिनिधी**

सोळा वर्षे वयाची अल्पवयीन मुलगी वावोशी फाटा येथून सोमवारी बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या पालकांनी खालापूर पोलीस ठाण्यात नोंदवली आहे. होराळे गाव येथे राहणारी अल्पवयीन मुलगी सोमवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास वावोशी येथे गेली होती. संध्याकाळी पाच वाजून गेले तरी ती घरी परत न आल्याने तिच्या पालकानी सर्वत्र चौकशी केली .परंतु तिचा काहीच तपास लागला नाही. मुलगी अल्पवयीन असल्याचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळून नेल्याची तक्रार मुलीच्या वडिलांनी खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. घटनेचा तपास सहाय्यक फौजदार राजेंद्र पाटील हे करत आहेत.

## खालापूर पोलीस ठाण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती खालापुरात उत्साहात साजरी करण्यात आली. खालापूर पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर विशाल नेहुल, तहसीलदार अभय चव्हाण, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार ,खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक मोहन भालेराव, मनीष मोरे, खालापूर माजी उपनगराध्यक्ष संतोष जंगम, हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, अमित गुजरे ,पोलीस कर्मचारी आणि खालापूर ग्रामस्थ सहभागी झाले होते.

यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले .उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल यानी विचार मांडताना डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असा समाज घडवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे तसेच त्यांनी केलेली रस्त्यावरची आंदोलन असो किंवा न्यायालयात लढलेले खटले हे सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी असल्याची भावना अधिकारी नेहूल यांनी व्यक्त केली. तहसीलदार अभय चव्हाण यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील सर्वोत्कृष्ट राज्यघटना आपल्या देशाला दिल्याचे सांगताना बाबासाहेबाना अभिप्रेत समता, स्वातंत्र्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊया असे आवाहन केले.वनविभाग कार्यालयात देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. महिला कर्मचाऱ्यांना प्रतिमा पूजेचा मान दिला.



## वीज समस्येमुळे मुरूड शहरात फक्त एक तास पाणीपुरवठा



**मुरुड : प्रतिनिधी**

कडक असा उन्हाळा सुरू झाल्याने सर्वत्र पाणीटंचाई सुरू झाली आहे.उष्णता वाढल्याने पाण्याची पातळी खूप खालावली आहे.त्यामुळे मुरुड तालुक्यासह शहरी भागात सुद्धा तीव्र पाणी टंचाईमुळे पाण्याचे सुयोग्य नियोजन करावे लागत आहे. मुरुड तालुक्यातील कोर्लई गावाला याचा सर्वाधिक फटका बसला आहे. फणसाड धरणातील पाण्याची पातळी खालावल्याने येथे पाण्याची बिकट अवस्था निर्माण झाली आहे. व्यवस्थित पाणी पुरवठा होत नसल्याने लोकांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. गेली अनेक दिवस लोक पाणीटंचाईस तोंड देत आहेत. पिण्याचे पाणी मिळत नसल्याने लोक हैराण झाले आहेत. ग्रामसभेत सुद्धा लोकांनी आवाज उठवला आहे. मुबलक पाणी मिळत नसल्याने येथील ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत.

आता ग्रामीण भागाप्रमाणेच मुरुड शहराला सुद्धा पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे.सुमारे १२ हजारच्या आसपास असणाऱ्या लोकसंख्येला मुबलक पाणी मिळत नसल्याने येथील लोक सुद्धा त्रस्त झाले आहेत.मुरुड शहराला आंबोली धरणातून पाणी पुरवठा होत असतो.सध्या तरी आंबोली धरणात मुबलक पाणी आहे.परंतु या भागात असणारा विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने मुरुड नगरपरिषदेस पाणी पुरवठा करणे जिक्रीचे बनले आहे.शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी या भागात विजेचे सातत्य टिकून राहणे खुप आवश्यक आहे. मुरुड शहर हे पर्यटन स्थळ असून येथे असंख्य हॉटेल व लॉजेस आहेत.शनिवार व रविवार येथे पर्यटक संख्या खूप मोठी असते अशा वाढत्या लोकसंखेस फक्त एक तास पाणी पुरवठा यामुळे येथे बिकट अवस्था निर्माण झाली आहे.मुरुड शहरातील काही भागात तर अर्धा तास पाणी दिले जात आहे.

**मुरुड नगरपरिषदेने रस्त्यावरील पथदिवे व आंबोली धरणाला पाणी पुरवठा करणारी विद्युत यंत्रणेचे लाखो रुपये थकीत ठेवले आहेत.वरिष्ठ कार्यालयाकडून आमच्यावर सतत दबाव येत असून पैसे भरणे खूप आवश्यक आहे.त्यांनी लवकरात लवकर पैसे भरले तर विजेमध्ये सातत्य ठेवण्याची जबाबदारी आमची असेल. नगर परिषदेने थकीत रक्कमेचा भरणा लवकरात लवकर करावा वीज पुरवठा नियमित होईल.**

**–कृष्णात सूर्यवंशी,**
**उप कार्यकारी अभियंता, महावितरण**

## दिल्लीत महिला शासकीय अधिकाऱ्यांचे पहिले मराठी साहित्य संमेलन रंगले



**पाली : प्रातिनिधी**

देशाच्या राजधानीत महाराष्ट्र सदन येथे छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' मोठ्या उत्साहात संपन्न झाले. 'जागर कर्तृत्वाचा, उत्सव साहित्याचा' हे ब्रीदवाक्य घेऊन पार पडलेल्या या ऐतिहासिक सोहळ्यात राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (MSCERT), पुणे येथील व्हिजिपीजी विभागाच्या अधिकारी दिपाली जोगदंडे यांना त्यांच्या विशेष योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र शासन (मराठी भाषा विभाग) आणि 'सरहद, पुणे' यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता.११) व रविवारी (ता.१२) हे संमेलन आयोजित करण्यात आले होते. प्रशासकीय जबाबदारी सांभाळून साहित्याची ओढ जपणा–या महिला अधिका–यांसाठी हे विशेष व्यासपीठ निर्माण करण्यात आले होते.

या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखिका आणि माजी अतिरिक्त मुख्य सचिव लीना मेहेंदळे (भा.प्र.से. निवृत्त) होत्या. संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. यावेळी मराठी भाषा मंत्री उदय सामंत, माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आणि स्वागताध्यक्षा सुप्रिया देवस्थळी यांच्यासह अनेक उच्चपदस्थ महिला अधिकारी उपस्थित होत्या.दोन दिवसांच्या या संमेलनात "अडथळ्यांपलीकडचं कर्तृत्व", "कार्यालय ते शब्दालय" आणि "महिला अधिकाऱ्यांची काव्यमय स्पंदने" अशा विविध सत्रांमधून महिला अधिकाऱ्यांच्या सर्जनशीलतेचे दर्शन घडले. याच व्यासपीठावर दिपाली जोगदंडे यांनी स्वीकारलेला सत्कार हा त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील अविरत कार्याचा आणि साहित्यिक रुचीचा गौरव मानला जात आहे. त्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. दिपाली जोगदंडे यांच्या या यशामुळे शैक्षणिक वर्तुळातून आणि मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या संमेलनामुळे प्रशासकीय फाईल्स आणि नियमांच्या पलिकडे जाऊन मराठी भाषेची सेवा करणा–या महिला अधिका–यांच्या कर्तृत्वाला नवी ओळख मिळाली आहे. समारोप सत्रात सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार आणि राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी उपस्थित राहून सर्व सहभागी महिला अधिकाऱ्यांचे कौतुक केले.


**सावधान नोटीस**

तमाम जनतेस हया सावधान नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशिल एल. आर. वेंकटरमण हयांनी बाळाराम चऱ्या सोनावळे उर्फ सोनावणे वैगेरे रा. पोयंजे हयांची मौजे पोयंजे, ता. पनवेल, येथिल खालील वर्णनाची जमिन खरेदी करण्यासाठी विक्री करार केलेला आहे.

**जमिनीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हिस्सा | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पोयंजे | जुना सर्व्हे नं. २२३<br>नविन सर्व्हे नं. २०७ | .......... | ०–२३–८०<br>०–०४–०० |

असे असताना वरील शेतकरी सदरची जमिन त्रयस्थ इसमास विकण्याच्या तयारीत आहेत असे समजते. आमचे अशिलांना सदर शेतकऱ्यांना कायदेशीर नोटीसा पाठवून पनवेल येथील दिवाणी कोर्टात दावा दाखल करण्याची प्रक्रीया मार्गस्थ केलेली आहे. सबब तमाम जनतेस कळविण्यात येते की, कोणीही सदरची जमिन खरेदी करू नये. तसे केल्यास होणाऱ्या परीणामास संबंधितास जबाबदार धरण्यात येईल हयाची नोंद घ्यावी.

कळावे, नोंद घ्यावी.

ठिकाण :– पनवेल
दिनांक : १५/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. वाय. एस. भोपी**
**१३५, नगरपालिका कॉपलेक्स,**
**भाजीमार्केट समोर, पनवेल,**
**ता, पनवेल, जि. रायगड**
**मो. नं. ९८२०२७३६९१**


## माणगावमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**माणगाव : बातमीदार**

समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवतेच्या मूल्यांचा दीप प्रज्वलित करणारे, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महान विचारवंत व समाजसुधारक विश्वरत्न, बोधिसत्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त माणगाव येथे भव्य जयंती महोत्सव उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. १, माणगाव विभाग २४ गाव ग्रुप यांच्या विद्यमाने काळनदी शेजारील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे हा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमास माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करीत मंगलमय प्रणाम केला. तसेच धम्मबंधू, भगिनी तसेच आंबेडकर प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.

या कार्यक्रमास बौद्धजन पंचायत समितीचे तालुका अध्यक्ष रविंद्र भि. मोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तर आयु. प्रशांत सु. गायकवाड यांच्या अध्यक्षते खाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.४५ वाजता स्वराज्य संघटनेचे संस्थापक पंकज तांबे यांच्या हस्ते धम्मध्वजारोहणाने झाली. त्यानंतर आयु. अरविंद मोरे यांच्या नेतृत्वाखाली धम्मवंदना घेण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान आयु. वैशाली प्रकाश पवार यांच्या हस्ते विहारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे धम्मदान करण्यात आले. त्यानंतर भिम गीतांचा कार्यक्रम आयु. संकेत कांबळे व आयुनी हृदया जाधव यांनी सादर केला.सायंकाळी ४ वाजता माणगाव बाजारपेठेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य व शांततामय मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत 'जयभीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी उत्तम तांबे, प्रशांत गायकवाड, अरविंद मोरे, प्रकाश मोरे, नायब तहसीलदार मनोज मोरे, दयाराम साळवी, उमाजी साळवी, रुपेश जाधव, नितीन मोरे, विलास शिर्के, दिलीप मोरे, कुंडलिक थोरे, यांच्या सह अनेक बौद्ध बांधव पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा जयंती महोत्सव केवळ उत्सवा पुरता मर्यादित न राहता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांचा प्रसार करणारा आणि समाजात बंधुभाव दृढ करणारा एक प्रेरणादायी कार्यक्रम ठरला.




**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे वाकडी, ता. पनवेल, जि. रायगड येथील **मंजुळा महेंद्र पाटील व इतर ६** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

परीशिष्ट
शेतजमिन मिळकतीचे वर्णन
मौजे वाकडी, तालुका.पनवेल, जि.रायगड.

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| मंजुळा महेंद्र पाटील<br>मुक्ता शांताराम पोपेटा<br>अनंता हाल्या मोहिते | ९१ | १ | ०-०३-३०<br>पो.ख.०-००-२०<br>एकुण ०-०३-५० | ०.५३ |
| अनिल हाल्या मोहिते<br>नामदेव हाल्या मोहिते<br>भागुबाई हाल्या मोहिते<br>रघुनाथ हाल्या मोहिते | ९१ | ३ | ०-०२-२०<br>पो.ख.०-००-८०<br>एकुण ०-०३-०० | ०.३४ |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट & लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat43@gmail.com


## कर्जतमधील शांतीदूत विहारात गौतम बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

**कर्जत : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त कर्जत तालुक्यातील डिकसल येथे असलेल्या शांतीदूत विहारामध्ये भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. साधारण चार फुटाची मूर्ती डॉ. नंदकुमार तासगावकर यांच्या माध्यमातून मंडळाला देण्यात आली. तासगावकर दाम्पत्याचे हस्ते या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली.



डिकसळ शांतीनगर मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी निमित्त बुद्ध वंदना कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने शांतीदूत मंडळ आणि रमाबाई महिला मंडळ यांच्या आवाहनानुसार तासगावकर उद्योग समूहाचे प्रमुख डॉ नंदकुमार तासगावकर यांच्या माध्यमातून भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती भेट देण्यात आली. ही मूर्ती ढोल ताशाच्या जल्लोषात शांतीनगर येथे आणण्यात आली.

यानंतर पयामी भंते यांनी बुद्ध वंदना करून झाल्यावर विधीवत ही मूर्ती स्थापित करण्यात आली. भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती तासगावकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चेअरमन डॉ.नंदकुमार तासगावकर तसेच वंदना तासगावकर त्यांच्या हस्ते मूर्तीचे मेणबती पेटवून पूजन करण्यात आले. उपासक सुनील जाधव, उपासक रमेश गायकवाड प्रास्ताविक ॲड. उत्तम गायकवाड यांनी केले.याप्रसंगी तासगावकर उद्योग समूहाचे नागसेन कांबळे, ॲड रमाकांत तरे, महेश काशिद, रायगड हॉस्पिटल चे कुशाग्र पटेल, आदीसह शांतीदूत मंडळाच्या संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत गायकवाड, किशोर गायकवाड, शांतीदूत मंडळाचे अध्यक्ष नितीन गायकवाड, सचिव विजय पवार, रमाबाई महिला मंडळाचे अध्यक्षा अर्चना गायकवाड, उपाध्यक्ष भारती भोईर, सचिव पूर्वा गायकवाड, महिला मंडळाच्या ज्येष्ठ हिराबाई हिरे, रेखा साळवी, संगीता गायकवाड, पुष्प लता गायकवाड, रेखा गायकवाड, रेखा जाधव, तनुजा गायकवाड, शुभांगी साळवी, मंगल वाघ, कमल ब्राह्मणे, मनिषा सोनवणे, श्वेता गायकवाड, मोनिका गायकवाड, जोस्ना गायकवाड, सारिका हिरे, रूपाली तांबे, करुणा वाघपंजे, प्रणाली गायकवाड, प्रेरणा गायकवाड, तूष्णा गायकवाड उपस्थित होते.

## तळा तालुक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे.

तालुक्यात शाळा, माध्यमिक शाळा, कॉलेज, शासकीय कार्यालयात विविध कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली आहे.काही ठिकाणी विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्यामधे रांगोळी, निबंध, वक्तृत्व अशा स्पर्धा घेण्यात आल्या आहेत .सदर कार्यक्रमांना नागरिकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.



# नवी मुंबईतील विकासकामांना मिळणार गती

## आमदार मंदा म्हात्रे यांची मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबईतील विविध प्रलंबित व महत्त्वाच्या विकासकामांबाबत आमदार मंदा म्हात्रे यांनी १३ एप्रिल २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयातील दालनात भेट घेऊन सविस्तर व गंभीर चर्चा केली. या बैठकीत नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी खालील महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली आहे.



नवी मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याच्या दृष्टीने झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गती देण्याबाबत सखोल चर्चा झाली. यामुळे गोर गरीब जनेतला सुरक्षित व सुसज्ज निवास उपलब्ध होणार आहे. महिला बचत गटांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी 'उमेद मॉल' उभारण्याकरिता नवी मुंबईमध्ये १००० चौ.मी.चा भूखंड उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येणार आहे.

बेलापूर येथे प्रस्तावित सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज प्रकल्पाला लवकरात लवकर गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले, तसेच आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकल्पांबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला असून, या बैठकीमुळे शहराच्या पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरणाला नवी चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# मोरबे धरणात १२ ऑगस्टपर्यंत पुरेल एवढा मुबलक पाणीसाठा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणात आत्ता १२ ऑगस्ट पर्यंत पुरेल इतका मुबलक पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्याचा जपून वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यातच भरीस भर म्हणून यावर्षी पावसाची सुरुवात उशिरा होणार असून पावसाचे प्रमाण ही कमीच असणार आहे. त्यामुळे महापालिकेची चिंता वाढली आहे.

नवी मुंबई महानगर पालिकेचे स्वतःच्या मालकीचे मोरबे धरण कर्जत येथे आहे. धावरी नदीच्या तीरावर असलेल्या या स्वतःच्या मालकीच्या धरणामुळे नवी मुंबई महानगर पालिका जनसंपन्न महापालिका ठरली आहे. धरणातील पाण्यामुळे महापालिकेला वर्षभर सुरळीतपणे पाण्याचा पुरवठा होत असतो. यामुळे महापालिकेला शहरात आतापर्यंत कधीही पाणी कपात करावी लागली नाही, मात्र सध्या वाढते शहरीकरण वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढणारी मागणी लक्षात घेता धरणातील पाणी कमी पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

नवी मुंबई महापालिका हद्दीत दररोज ४९८.९० एम एल डी. पाणी पुरवठा केला जातो. यातील ४३४.८८ एम एल डी पाणी मोरवे धरणातून पुरवले जाते. इतर पाणी महापालिका एमआयडीसी कडून घेऊन शहरातील पाण्याची गरज भागवते. याचबरोबर नवी मुंबई महापालिकेच्या या मोरबे धरणातून पनवेल मधील कामोठे सिडको वसाहती खारघर भागातही पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे धरणातून दररोज ४९६.२६ एम एल डी पाणी उपसा दररोज होत असतो.

यानुसार धरणात सध्या १२२ दिवस पुरेल इतकाच पाणी साठा उपलब्ध आहे. म्हणजेच १२ ऑगस्ट पर्यंत पाण्याचा हा साठा वापरता येईल. विशेष म्हणजे गेल्या वर्षी याच दरम्यान धरणात ५०.३८% पाणीसाठा उपलब्ध होता. मात्र यावर्षी धरणात आता केवळ ४६.६७ टक्के पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या मानाने यावर्षी धरणात कमी पाणी उपलब्ध आहे.

मोरबे धरणातील पाणी साठवणूक क्षमता ही १९०.८९० मिलियन क्युबिक मीटर इतकी आहे. इतके पाणी धरणात साठले की धरण १०० टक्के भरले. यातील १०.४० टक्के पाणी साठा हा मृत साठा म्हणून ठेवला जातो.

> **महापालिकेच्या मोजवे धरणात आता १२२ दिवस पुरेल इतका पाणी साठा उपलब्ध आहे. नवी मुंबईत सध्या तरी पाणीकपात करण्यात आलेली नाही, मात्र नागरिकांनी पाणी जपून वापरणे गरजेचे आहे.**
> **–संतोष उनवणे,** कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग

आत्ता एप्रिल महिना सुरू असून पुढे अजून मे महिना आणि त्यानंतर जून महिना बाकी आहे. यावर्षी पावसालाही उशिराने सुरुवात होणार असल्याचा आणि त्यानंतरही सरासरी एकूण पाऊस कमीच पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यामुळे महापालिकेची पाण्याची चिंता वाढली आहे. एकूणच ही परिस्थिती बघता शहरातील नागरिकांनी आतापासूनच पाणी जपून वापरण्याची गरज निर्माण झाली आहे.

# खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ग्रंथालयाचा सामंजस्य करार

**खारघर : रामप्रहर वृत्त**



रामशेठ ठाकूर वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय खारघर येथील ग्रंथालयाचा सामंजस्य करार सोमवारी बोर्ड रूम येथे उत्साहात पार पडला. सामंजस्य करार हा आर यू आर ग्रीन लाइफ, वाशी आणि रामशेठ ठाकूर महाविद्यालय यांचे ग्रंथालय विभाग यांच्यामध्ये तीन वर्षासाठी करण्यात आला.

सामंजस्य करार यांचा मुख्य हेतू हा गो ग्रीन विथ टेट्रा पॅक, इको फ्रेंडली वातावरण निर्माण करणे, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे आणि सदर वस्तू वापरणे तसेच ग्रंथालयाचे आधुनिकीकरण आणि वाचकांना दिल्या जाणाऱ्या माहितीविषयक सेवा सुविधा यामध्ये संगणकीकरण करणे तसेच वाचकाचे समाधान करणे हा होता.तसेच ग्रंथालय हे नॉलेज रिसोर्स सेंटर करणे हा मूलभूत उद्देश होता.

सामंजस्य करार करण्यासाठी प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, ग्रंथालय समिती प्रमुख डॉ. पूजा लांजेकर, ग्रंथपाल समाधान बेहेरे सर, आर यू आर ग्रीन लाइफ कंपनी यांचे समन्वयक अश्विनी मॅडम आदी उपस्थित होते. यावेळी आर यू आर ग्रीन लाइफ कंपनी यांनी ग्रंथालयास वाचकांना बसण्यासाठी तीन बेंचेस भेट दिल्या.

शेवटी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ महेश्वरी झिरपे मॅडम आणि आर यू आर ग्रीन लाइफ कंपनी यांचे समन्वयक अश्विनी मॅडम आणि ग्रंथालय समिती प्रमुख डॉ पूजा लांजेकर यांनी सामंजस्य करार यावर सही करून सदर सामंजस्य करार घडवून आणला.

## पगार मागितल्याने एकाला दमदाटी

**पनवेल :** पगार मागण्यास गेला असता शिवीगाळ आणि दमदाटी केल्याप्रकरणी आरोपीवर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मेहकर शमशाद शेख हा धारावी (मुंबई) येथे राहात असून, खांदा कॉलनीमधील एका कंपनीत सिव्हिल इंजिनिअर म्हणून काम करत होता. ५५ हजार रुपये पगारावर तो याठिकाणी चार महिने काम करत आहे. कंपनीने दोन महिन्यांपासून पगार न दिल्याने शेखने याबाबत विचारणा केली, मात्र त्याला शिवीगाळ करत. दमदाटी करण्यात आली.

# गव्हाण विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांचे शुभहस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तर कनिष्ठ लेखनिक चंद्रकांत मढवी यांचे हस्ते श्रीफळ अर्पण करण्यात आला.

यावेळी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांचेसह ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख संजय उगले, ज्येष्ठ ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी, माणिक घरत व अर्चना पाटील, उपशिक्षिका चारूशिला ठाकूर, सुजाता शेलार, जनार्दन खैरे, अरूण कोळी आदी उपस्थित होते.

# गाडीची काच फोडून दागिने, रोख रक्कम चोरणारे दोघे गजाआड

**पनवेल : वार्ताहर**



उभ्या गाडीची काच फोडुन आतील मौल्यवान दागिने व रोख रक्कम चोरणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले असून त्यांच्याकडून मौल्यवान दागिन्यासह रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी वाहन हस्तगत केले आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील गो ग्रिन हॉटेल, कल्ले गाव या हॉटेलचे पार्किगमध्ये फिर्यादी यांनी पार्क करुन ठेवलेल्या फॉर्च्यूनर कारच्या डाव्या बाजुची पाठीमागील काच फोडुन गाडीतील पर्सची व पर्समधील एकूण ८,४८,५०० रुपये किमतीचे दागीने व रोख रक्कम चोरी केली असून सदर बाबत पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हयाचा करण्यात आलेला तांत्रीक तपास व गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त करण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस उप निरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा महेश धुमाळ, पोहवा सुनिल कुदळे, पोहवा सतिष तांडेल व पोहवा शिवाजी बाबर यांचे पथकाने इंडी, जि. विजापूर, कर्नाटक येथे जावून सापळा रचून सदर गुन्हा करणारे आरोपीत नामे शेरा सुरेश चव्हाण (वय ४१ वर्षे, रा. शिरढोण, मानपाडा, डोंबिवली मु.रा. उत्तरप्रदेश) व विनोद उर्फ लंगडा अशोक पवार (वय ४३, रा. अंबुजवाडी, लक्ष्मी चाळ, मालवणी, मालाड, मुंबई मुळ रा. कर्नाटक) यांना ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे. सदर दोन्ही आरोपीत यांना मा. न्यायालयाने दि. १६/०४/२०२६ रोजीपर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली असून पोलीस कोठडी दरम्यान आरोपीतांकडे केलेल्या तपासादरम्यान त्यांचेकडून गुन्हयातील चोरी केलेले तोळे सोने व लेडीज पर्स असा एकूण १८३,५०० रुपये किमतीचा ऐवज व आरोपीतांनी गुन्हयात वापरलेली ७०,००० रुपये किमतीची यामाहा एफझेड मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे.

आरोपीतांकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास करण्यात येत आहे. सदर दोन्ही अटक आरोपीत हे सराईत गुन्हेगार असून त्यांचेवर विविध पोलीस ठाण्यात खालील नमुद तयाप्रमाणे गुन्हे नोंद आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आरोपी शेरा सुरेश चव्हाण यांचेविरुध्द मुरबाड पोलीस ठाणे, निगडी पोलीस ठाणे, वर्सोवा पोलीस ठाणे, कोपरखैरणे पोलीस ठाणे, खारघर पोलीस ठाणे, नवघर पोलीस ठाणे, सीबीडी बेलापुर पोलीस ठाणे , पनवेल शहर पोलीस ठाणे, रबाळे पोलीस ठाण, एनआरआय सागरी पोलीस ठाणे, तळोजा पोलीस ठाणे, खांदेश्वर पोलीस ठाणे, नेरुळ पोलीस ठाणे, मनोर (पालघर) पोलीस ठाणे, दादर (मुंबई) पोलीस ठाणे, बोईसर (पालघर) पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत तर आरोपी विनोद उर्फ लंगडा अशोक पवार यांचेविरुध्द निगडी (पिंपरी चिंचवड) पोलीस, गावदेवी पोलीस ठाणे, मालवणी पोलीस ठाणे, चारकोप पोलीस ठाणे, बोरीवली पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत.

# कळंबोली परिसरातून साडेपाच लाखांचे हेरॉईन जप्त

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली पोलिसांनी अमली पदार्थविरोधी कारवाई करत सुमारे पाच लाख ६७ हजार रुपये किमतीचे हेरॉईन जप्त केले असून या प्रकरणी दोघांना अटक केली आहे.

तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. याप्रकरणी कळंबोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मार्बल मार्केट परिसरातील झोपडपट्टीजवळ काही जण हेरॉईन विक्रीसाठी आणणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून कारवाई केली. यात रोहित राजभान सिंग उर्फ रुबी आणि जमील मोहम्मद वालामनसा चौधरी यांना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळून मोठ्या प्रमाणात हेरॉईन जप्त केले.

दोघांविरोधात गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली असून तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून अमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांनी मोहीम अधिक तीव्र केली आहे.

दरम्यान, अंमलीपदार्थ बाळगणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे.



**पनवेल : युवा मोर्चा नवीन पनवेल अध्यक्ष मयुर कदम यांना वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील शुभेच्छा दिल्या.**

# नवीन पनवेलच्या हॅप्पी मेडिकेअर सेंटरचा वर्धापन दिन उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात अनेक लोक कसल्या ना कसल्या शारीरिक त्रासापासून त्रस्त आहेत. अशा शारीरिक व्याधी पासून पिढीत असलेल्या लोकांचे चेहऱ्यावर आनंद निर्माण करता येणारे लोक संतांपेक्षा कमी नसतात. कारण कसल्याही वैयक्तिक अपेक्षा न ठेवता , फायदा तोटा याचा विचार न करता नवीन पनवेल पूर्व येथे हॅपी मेडिकेअर जर्मनियम थेरेपी सेंटर अर्चना सागर साठे आणि आणि सागर राजश्री बाळासो साठे या या दांपत्याने सुरू केले.

हे कार्य गेले नऊ वर्षे त्यांनी सुरू ठेवले आणि अनेक लोकांना थेरेपी देऊन त्रास मुक्त केले. विशेष म्हणजे थेरेपी देताना कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारलेले नाही. या अशा सेंटरचा नववा वर्धापन दिन नुकताच गणेश मार्केट नवीन पनवेल पूर्व इथे सेंटरच्या जागेत साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी माजी सैनिक आणि हडपसर सेंटरचे संचालक धीरज पाटील, साने चौक पुणे सेंटरचे प्रवीण गायकवाड आवर्जून हजर होते. याप्रसंगी संस्थेने १० व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल साठे ग्रामपंचायत सत्कार धीरज साठे आणि प्रवीण गायकवाड यांच्या हस्ते अरुण पाटकर आणि कुटुंबीयांनी कृतज्ञता सन्मानचिन्ह देऊन केला. त्याचबरोबर त्यांचे सहकारी सोनाली धनराज बाविस्कर, तनुजा रामचंद्र सावंत, दिक्षिता दीपक आग्री, रोहिणी कांबळे, रोहिणी प्रवीण कांबळे, जितेश विश्वास कांबळे, प्रीती राजेश कांबळे, आराधना प्रताप ब्राह्मण, रुचिता प्रताप ब्राह्मण यांनाही सन्मानचिन्ह देऊन सुरेखा अरुण पाटकर आणि संदीप पाटकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

याचबरोबर प्रमुख पाहुणे यांनासुद्धा सन्मानित करण्यात आल्यामुळे अत्यंत भावूक होऊन प्रमुख पाहुणे धीरज पाटील आणि प्रवीण गायकवाड यांनी आनंद व्यक्त केला. आजच्या रेडिएशनच्या या काळात मानवाच्या शरीरावर कळत नकळत खूपच परिणाम होत आहेत. त्यामुळे यावर जर्मनियम थेरपीच्या मॅट व बेडच्या उपयोगाने माणसाचा त्रास कमी होण्यास नक्कीच मदत होते असे प्रतिपादन त्या त्यांनी केले. या समारंभाला पत्रकार समाधान पाटील आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंगचे सचिव संजय सरदेसाई यांनी सदिच्छा भेट दिली.

# पनवेलमध्ये आरएसएसकडून सकल हिंदू संमेलनाचे शिस्तबद्ध नियोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पनवेलमधील बल्लाळेश्वर वस्ती व लाईन आळी वस्तीतील सकल हिंदू संमेलन रविवारी (दि.१२) ज्येष्ठ नागरिक संघ हॉलमध्ये झाले. अनेक सज्जन शक्तिंच्या एकत्रित संयोजन समितीने हा कार्यक्रम आयोजित केला होता. संघशाखेच्या शिस्तबद्ध नियोजनातून परिवाराच्या कार्यकर्त्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करून पनवेलच्या संस्कृतीमध्ये मानाचा तुरा खोवला.

सुरुवातीलाच स्वरसम्राज्ञी आशाताईंना श्रद्धांजली वाहून कार्यक्रम वेळेत चालू झाला. आलेल्या नागरिकांची नोंदणी QR CODEच्या माध्यमातून सुटसुटीत व कालानुरूप पद्धतीमुळे सुरवातीचा गोंधळ गडबड व कार्यकर्त्यांच्या गडबडीशिवाय संपन्न झाला. अध्यक्ष नंदकुमार कर्वे यांनी अतिशय थोडक्यात संमेलनाचा उद्देश सांगितला. सुरुवातीलाच आयुष पवार आणि ओम राजे या दोन तरुणांनी गायलेले पोवाडे उन्हातून आलेल्या श्रोतृ वर्गात जोश निर्माण करून गेला. रायगड भूषण किर्तनकार, पत्रकार व अनेक पुरस्कार मिळवलेले श्रीराम पुरोहित यांनी आतापर्यंत मिळालेल्या पुरस्कारांना साजेसे असे उद्बोधन करून हिंदू धर्मातील पुढील काळात येणाऱ्या संकटांची जाणीव करून देत संमेलनाचे महत्त्व हिंदू मुस्लिम यांच्या लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास समोर ठेवून कर्जत तालुक्यातील ख्रिचॅनिटीबाबत लोकांच्या डोळ्यात अंजन घातले. त्यानंतर कुमारी पेंडसे हिने सादर केलेला अभंग लोकांना खूपच आवडला. सुनिता खरे यांचे पंच परिवर्तनातून समाज बदलाचे व त्यात असलेली नारी शक्ती चे महत्व पुरुष वर्गात दाद मिळवून गेले. व नारी शक्तीला कार्यक्रम शेवटपर्यंत ऐकण्याची गोळी देवून गेला.

रा. स्व.संघ रायगड विभाग संघचालक रघुजीराजे आंग्रे यांचे उद्बोधन व संमेलनामागील व्यवहार्यता मनाला चटका लावून गेली. मेघना कदम या वनवासी कल्याण आश्रमात तयार झालेल्या निवेदिकेने लाघवी शब्दात केलेले निवेदन केले. अनया करंदीकर, रोहिणी टिळक यांनी स्टेज व्यवस्थापन समर्थपणे पेलले, चंद्रकांत मने यांनी पोस्टर बॅनर इ. छपाईची कामे आदिती जोशी यांच्या सहकार्याने छान केली.

या कार्यक्रमास माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, महापौर नितीन पाटील, कीर्तनकार, प्रवचनकार, सामाजिक क्षेत्रातील जेष्ठ व्यक्ती उपस्थित होते.

# माणगावमध्ये कोट्यवधींच्या विकासकामांचा शुभारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव शहराच्या विकासाच्या वाटचालीत आशेचा आणि विश्वासाचा नवा किरण उजळला असून, सुमारे दोन कोटी ९१ लाख रुपयांच्या २९ विविध विकासकामांचा शुभारंभ खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. हा सोहळा केवळ कामांचा प्रारंभ नव्हता, तर माणगावच्या उज्वल भविष्याचा पाया रचणारा आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना नवी दिशा देणारा ठरला.

कार्यक्रमस्थळी नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विकासाची आशा, तर डोळ्यांत उद्याच्या प्रगतीची स्वप्ने दिसत होती. या कार्यक्रमाला अ‍ॅड. राजीव साबळे, आनंदशेठ यादव, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष रिया उभारे तसेच सर्व नगरसेवक, नगरसेविका व पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने माणगावच्या विकासासाठी एकजूट दाखवत सकारात्मक संदेश दिला.

माणगाव शहराचा विस्तार इंदापूर, बामणोली, निजामपूर, ढालघर आणि मोरबा या गावांच्या दिशांनी झपाट्याने होत आहे. नव्या वस्त्या, वाढती लोकसंख्या आणि बदलती जीवनशैली यामुळे शहराच्या पायाभूत सुविधांवर ताण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर रस्ते, वीज, प्रकाशयोजना आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत गरजांकडे विशेष लक्ष देत विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. हायमास्ट दिवे, स्ट्रीट लाईट आणि सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे शहर अधिक सुरक्षित, प्रकाशमान आणि पर्यावरणपूरक होणार आहे. अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करणारे हे बदल माणगावच्या नव्या युगाची साक्ष देत आहेत.

माणगावच्या विकासात शिक्षण आणि रोजगाराला केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. सीबीएससी शाळा, नर्सिंग व फिजिओथेरपी महाविद्यालयांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळत आहे. अनेक पालकांच्या डोळ्यांत आपल्या मुलांनी मोठे व्हावे, काहीतरी घडवावे, ही स्वप्ने आता साकार होण्याच्या मार्गावर आहेत. दिघी पोर्ट आणि एमआयडीसीच्या माध्यमातून सुमारे १४०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी मिळाल्याने स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. घराजवळच रोजगार मिळावा, ही अनेक वर्षांची अपेक्षा आता पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहे.

यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी नागरिकांच्या गरजांशी निगडित महत्त्वपूर्ण घोषणा करत विकासाला ठोस दिशा दिली. वाकडाई मंदिर रस्ता ७० लाख रुपये मंजूर; उर्वरित ३० लाख रुपये याच वर्षात उपलब्ध करून देण्याचे आश्वासन, भव्य शिवसृष्टी प्रकल्प : माणगावच्या सांस्कृतिक ओळखीला अधोरेखित करणारी शिवसृष्टी उभारण्यासाठी निधी मंजूर; लवकरात लवकर जागा निश्चित करून काम सुरू करण्याचे आवाहन केले.

यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्याहस्ते माणगाव नगरपंचायतीतील प्रभाग क्र. १३ निजामपूर रोड गटार बांधकाम करणे या कामाचे भूमिपुजन, प्रभाग क्र. १७ मधील बाजारपेठ येथे सभागृह बांधणे या कामाचे भुमिपुजन, प्रभाग क्र. १५ अंतर्गत रस्ते करणे या कामाचे भुमिपुजन, प्रभाग क्र. १२ मधील रस्ता डांबरीकरण करणे या कामाचे भूमिपुजन, प्रभाग क्र. ११ वेरी नाणोरे येथील हिंदू स्मशानभूमी बांधकाम करणे या कामाचे भुमिपुजन, गणेश नगर येथील मातोश्री गंगूबाई संभाजी शिंदे सी.बी.एस.सी शाळेकडे जाणारा रस्ता करणे या कामाचे भुमिपुजन, आठवडा बाजार प्रवेशद्वारे येथील कमानीचे उद्घाटन करणे, विरेश्वर नगर कालवा परिसर सुशोभिकरण करणे या कामाचे भुमिपुजन, प्रभाग क्र. १३ शिवाजी नगर येथील रसता करणे या कामाचे भूमिपुजन, प्रभाग क्र. ६ वंदन अर्पाटमेंट येथे गटार बांधकाम करणे या कामाचे भुमिपुजन, प्रभाग क्र. ७ मध्ये तहसिल कार्यालय व श्री. शिरीष तलाठी यांचे घरापर्यंत गटार बांधणे या कामाचे भुमिपुजन, आदर्श समता, नगर येथील सभागृह दुरूस्ती करणे या कामाचे भूमिपुजन, उतेखोल गाव, वाकडाई मंदिराकडे जाणारा रस्ता करणे या कामाचे भुमिपुजन, प्रभाग क्र. ०५ भादाव येथील अंतर्गत गटार बांधणे व रस्ता करणे या कामाचे भूमिपुजन इत्यादी कोट्यवधी रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला.

# बोरघाटात टँकर उलटला

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटातील वाळक्याच्या मोरीजवळ केमिकल वाहून नेणाऱ्या टँकर चा ब्रेक फेल झाल्याने टँकर उलटला. टँकर चालक अडकल्याने केबिनमध्ये अडकल्याने पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत चालकाला बाहेर काढून खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल केले. टँकरमध्ये बेंजीन नावाचे ज्वलनशील रसायन असल्याने केमिकल एक्स्पर्ट धनंजय गीध यांना पाचारण करण्यात आले. तर

महामार्ग पोलीस बोरघाट खोपोली पोलीस खोपोली अग्निशमन दल डेल्टा फोर्स हेल्प फाउंडेशन या सर्व यंत्रणा कोणतेही आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून घटनास्थळी दाखल झाल्या. या टँकरमधील केमिकल हे ज्वलनशील नसल्याची खात्री केमीकल एक्स्पर्ट धनंजय गीध यांनी पाहणी अंती केल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. या घटनास्थळा पासून काही अंतरावर रहिवासी परीसर असल्याने काही घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. अपघातग्रस्त बाधित वाहन बाजूला काढून सुरक्षित जागी हलविण्यात आले. नंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. या घटनेने अर्धा तास वाहतुक ठप्प झाली होती. ही घटना मंगळवारी रात्री १ वा सुमारास घडली.

वाहनावर लिहिलेल्या सूचनेत ते ज्वालाग्रही केमिकल असे सूचना फलक होते, मात्र प्रत्यक्षात इडिबल ऑइल या वाहनातून वाहून नेला जात होता. म्हणजे केमिकल नव्हतं. ऑईल होते. मागील महिन्यात प्रोपोलीयन टँकरचा अपघात होता. या घटनेने केमिकल टँकरची आठवण जागी झाली.



# मेहेंदळे हायस्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**नागोठणे : बातमीदार**



रोहा येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवार, १४ एप्रिल रोजी विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ठिक ८ वाजता शासकीय नियमांचे पालन करून करण्यात आली. यावेळी प्राचार्य रमेश मोसे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सकाळ सत्र प्रमुख नारायण पानसरे, संग्राम गायकवाड तसेच दुपार सत्र प्रमुख किशोर पाटील, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान समिता वाघमारे व सुविनयकुमार अहिरे यांनी प्रतिमेसमोर प्रार्थना सादर केली. तसेच इयत्ता ११ वीचा विद्यार्थी नील पिंपळे आणि आठवीतील विद्यार्थिनी सलोनी काळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर भाष्य करताना भारतीय राज्यघटनेचे महत्त्व विशद केले. यावेळी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता, धर्म, जात, लिंग यावर आधारित भेदभावाला मनाई, तसेच अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शिक्षण व समान संधी यांसारखे मूलभूत अधिकार प्राप्त झाले असल्याची माहिती देण्यात आली.

विविधतेत एकता राखत सर्वांना न्याय, समता व बंधुता या मूल्यांवर आधारित समाज उभारण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला. शाळेतील कलाशिक्षक सुनिल दाभाडे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे सुंदर चित्र रेखाटले व ते सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र बनले. हा कार्यक्रम उत्सहापुर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचारी विनोद वाघमारे व प्रज्योत पाटील यांनी मेहनत घेतली.

# पेणमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती पेण नगरपरिषद व विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी मंदिर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सामुदायिक बुद्धवंदना करण्यात आली. तसेच यानिमित्त शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासदेखील पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी माजी खासदार धैर्यशिल पाटील, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, सभागृह नेते अनिरुद्ध पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील, सभापती स्मिता माळी, आनंद जाधव, कलावती पाटील, आफरीन अखवारे, नगरसेवक अजय क्षिरसागर, पल्लवी कालेकर, संगीता लाड, निळकंठ म्हात्रे, सुशीला ठाकूर, जास्विन पाटील, भूषण कडू, प्रविण पाटील, कृष्णा भोईर, माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र ठाकूर, उद्योजक राजू पिचिका, दिलीप लाड, पांडुरंग जाधव, जनार्दन जाधव, नगरसेवक, नगरसेविका व बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगर परिषद सभागृहातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना अभिवादन करण्यात आले.





# रेवदंडा पंचशील नगर येथे महामानवाला अभिवादन

**रेवदंडा : प्रतिनिधी**



रेवदंडा येथील पंचशील नगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या निमित्ताने पंचशील नगर ग्रामस्थांच्या वतीने भव्य सजावट, आकर्षक विद्युत रोषणाई तसेच मंडप उभारण्यात आला होता. व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य प्रतिमा स्थापित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी रेवदंडा पंचक्रोशीतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पंचशील नगर ग्रामस्थांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. तसेच विविध मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

सायंकाळी पंचशील नगर ते रेवदंडा बाजारपेठदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत ग्रामस्थ, महिला व युवकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नितीन गायकवाड, मधुकर गायकवाड, सचिन पवार, सतीश पवार, ऋतिक पवार, गौरव गायकवाड, अमोल गायकवाड, जीवन जाधव आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# रायगडच्या सुपुत्रांचा दिल्ली अँटी करप्शन बोर्डकडून सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यातील अँटी करप्शन बोर्डच्या तीन पदाधिकाऱ्यांचे दिल्लीतील कॉन्सिटिशन क्लबमध्ये सन्मान करण्यात आला. दिल्ली येथे अँटी करप्शन बोर्डने आपल्या विभागात कार्यरत असणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा 'भारत की शान' 'ऍक्टिव्ह मेंबर' आदी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अँटी करप्शन बोर्डचे नॅशनल प्रेसिडेंट आर. के. जैन व अँटी करप्शन वुमन सेल नॅशनल प्रेसिडेंट ज्योती जैन यांच्या मार्गदर्शन व सहकार्यांनी दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे पदाधकांचा सन्मान सोहळा करण्यात आला. यावेळी दिल्ली येथील कार्यक्रमाचे अध्यक्ष अण्णा खैरनार यांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांना पुरस्कार देण्यात आले. कर्जत तालुक्यातील देवपाडा येथील भरत पांडुरंग राणे यांना भारत की शान या पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच रामदास जनार्दन माळी व काशिनाथ धुळे यांना ऍक्टिव्ह मेंबर या पुरस्काराने गौरवण्यात आले. या पुरस्कारांमुळे तिन्ही पदाधिकाऱ्यांचे कर्जत कौतुक पाहायला मिळत आहे.

अँटी करप्शन बोर्ड, के लाईन टाइम्स, युनिटी ऑफ प्रेस अँड मेडिया असोशियन यांच्या सर्वांच्या सहकार्याने हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र देशमुख, तसेच रेणुका पालकर, रोशनी दिनेश गुलवी, रविदास बाविस्कर यांनाही सन्मानित करण्यात आले. तसेच या पुरस्कारासाठी संपूर्ण देशातील अनेक राज्यांमधून पदाधिकाऱ्यांची उपस्थिती पाहायला मिळाली. प्रत्येक राज्यामध्ये दोन ते तीन पुरस्कार प्रदान करण्यात आले. टोटल ५२ पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यातच महाराष्ट्र राज्यातील पदाधिकाऱ्यांसाठी २१ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

त्यामध्ये हॉनरीं डॉक्टररेट पदवी, भारत की शान, बेस्ट लीडरशिप, ऍक्टिव्ह मेंबर असे अनेक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# पोलीस भरतीत यशस्वी झालेल्या प्रणय भगतचा अमित घाग यांच्याकडून सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यातील बोरघर गावातील तरुण प्रणय वैशाली बंडू भगत याने पुणे सिटी पोलीस शिपाई भरतीमध्ये यश मिळवत गावाचे नाव उज्वल केले असून, त्याच्या या यशाबद्दल रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग यांनी त्याच्या घरी जाऊन सत्कार केला.

प्रणय हा बीएससी शिक्षण पूर्ण केलेला असून, शिक्षणानंतर त्याने धाटाव औद्योगिक क्षेत्रात व मुंबई येथील एमआयडीसीमध्ये काम करत कष्टाची जाणीव अनुभवली. दिवसाचे काम आणि त्यानंतर मैदानावर सातत्याने सराव करत त्याने स्वतःला घडवले. “पोलीस दलात भरती होऊन जनतेची सेवा करायची” हा निर्धार त्याने मनाशी पक्का केला होता आणि त्याच जिद्दीच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले.

पुणे पोलीस मुख्यालय येथे झालेल्या परीक्षेत त्याने १३० गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. अंतिम कटऑफ १२९ गुणांवर असताना एक गुणाने अधिक मिळवत त्याने पात्रता मिळवली. बोरघर गावातील पोलीस भरतीत यश मिळवणारा तो पहिलाच युवक ठरला आहे.

प्रणयचे यश हे संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानास्पद असून, अशा तरुणांनी समाजासाठी प्रेरणादायी कार्य करावे, असे मत व्यक्त केले.

यावेळी रोहा तालुका भाजप उपाध्यक्ष परशुराम माने, रोहा तालुका युवा मोर्चा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, तसेच भाजपाचे ज्ञानेश्वर भगत, सुमित जंगम, रितेश बारस्कर यांच्यासह राजु भगत, प्रसाद भगत, स्वप्नील भगत, प्रणित माने, युवराज माने आदी उपस्थित होते.

# माणगावमध्ये आठवडा बाजार कमानीचे लोकार्पण



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील कालवा परिसर आठवडा बाजार येथील क्रांतीनगर कालवा ब्रिज ठिकाणी प्रवेशद्वाराजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या कमानीचा ‘कै.शिवराम भाऊ यादव आठवडा बाजार’ या नावाने लोकार्पण सोहळा सोमवार, १३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वा.रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते उत्साहात झाला.

कै.शिवराम उर्फ भाऊ यादव हे माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक आनंदशेठ यादव यांचे वडील असून ते माणगाव नगरीचे एक आदर्श असे व्यक्तिमत्व म्हणून सर्वत्र परिचित होते. कै.शिवराम भाऊ यादव यांच्या नावाने माणगाव मधील कालवा परिसरात दर सोमवारी मोठ्या प्रमाणत भरणाऱ्या आठवडा बाजाराच्या नव्याने उभारण्यात आलेल्या कमानीचा लोकार्पण सोहळा संपन्न होत असताना तमाम माणगावकरांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह दिसत होता.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे कोकण प्रवक्ते अ‍ॅड.राजीव साबळे, जिल्हा राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,राजिप सदस्य अस्लम राऊत, माजी नगराध्यक्ष आनंद यादव,माणगाव पंचायत समिती उपसभापती मनीषा मालोरे, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष रिया उभारे, पंचायत समिती सदस्य अलका केकाणे, माजी नगरसेविका भाग्यश्री यादव, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे,दिलीप जाधव, संदीप खरंगटे, माजी नगरसेवक जयंत बोडेरे, उणेगावचे माजी सरपंच राजेंद्र शिर्के, तन्मय यादव, सुचिता यादव, तनिष यादव, द्विती यादव, जेष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे आदींसह आजी - माजी नगरसेवक, नगरसेविका, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते तसेच यादव परिवार व मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रसार माध्यमांजवळ बोलताना खासदार तटकरे यांनी कै.शिवराम भाऊ यादव यांच्या कार्याचा विशेष गौरव करताना त्यांचे सुपुत्र आनंदशेठ यादव हेदेखील आज बहुजन समाजात उल्लेखनीय काम करीत असल्याचे सांगून आठवडा बाजार कमानीला कै.भाऊ यादव यांचे नाव दिल्याने या आठवडा बाजाराच्या निमित्ताने कै.भाऊ यादव यांचे नाव कायम माणगावकरांच्या स्मरणार्थ राहील, असे सांगत माणगावच्या विकासासाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहीन अशी ग्वाही दिली.

# उज्वला चंदनशिव यांना शिवरत्न पुरस्कार

**रेवदंडा : प्रतिनिधी**



‘शिवप्रेमी सामाजिक संस्था’ लोणारे यांच्या वतीने उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्वला भालचंद्र चंदनशिव यांना ‘सामाजिक क्षेत्र शिवरत्न भूषण पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार १२ एप्रिल २०२६ रोजी सुप्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते व अमरावती उपजिल्हाधिकारी सचिन शेजाळ यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला असून, त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची ही दखल मानली जात आहे.

उज्वला चंदनशिव यांनी सामाजिक क्षेत्रात महिलांच्या सक्षमीकरणासाठी, तसेच प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी विविध स्तरांवर सातत्यपूर्ण व प्रभावी काम केले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना स्वावलंबनाचा मार्ग मिळाला असून समाजात सकारात्मक बदल घडून आला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले जात आहेत. यामध्ये २४ तास सेवा देणारा उज्वल दवाखाना, महिलांसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, ‘सहजानंद आध्यात्मिक गोपाळ निवास हॉस्टेल वृद्धाश्रम’, तसेच पेशंट केअर सेवा यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पांमुळे समाजातील गरजू घटकांना मोठा आधार मिळत आहे.

# राजस्थानचा विजयरथ हैदराबादने रोखला

## प्रफुल्ल, साकिबचा भेदक मारा



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

इशान किशनच्या नेतृत्वाखालील सनरायझर्स हैदराबाद संघाने राजस्थान रॉयल्सवर ५७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह हैदराबाद संघाने राजस्थानचा विजयी रथ रोखला. भारताच्या देशांतर्गत क्रिकेटमधील दोन तारे या सामन्यात हैदराबादकडून झळकले. प्रफुल्ल हिंगे व साकिब हुसैन यांनी या पदार्पणाच्या सामन्यातच हैदराबादसाठी तारणहार ठरले. दोघांनीही प्रत्येकी विकेट्स घेत राजस्थानच्या फलंदाजीला सुरूंग लावला.

सनरायझर्स हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना या सामन्यात २० षटकांत ६ बाद २१६ धावांची खेळी केली. यानंतर राजस्थान संघाला हैदराबादच्या नव्या गोलंदाजांनी धावा करण्याची संधी दिली नाही. प्रफुल्ल हिंगे व साकिब हुसैनच्या गोलंदाजीसमोर राजस्थान रॉयल्सचा संघ १५९ धावांवर सर्वबाद झाला.

हैदराबादने दिलेल्या २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानच्या संघाने पहिल्याच षटकात गुडघे टेकले. प्रफुल्ल हिंगने वैभव सूर्यवंशी, ध्रुव जुरेल व लुहान डे प्रिटोरियस या तिघांना शून्यावर बाद केले. यानंतर दुसऱ्या षटकात साकिब हुसैनने यशस्वी जैस्वालला एका धावेवर बाद केले. मग रियान पराग प्रफुल हिंगेचा बळी ठरला. यानंतर रवींद्र जडेजा व डोनावव फरेरा या जोडीने ७२ चेंडूत ११८ धावांची भागीदारी रचली, पण संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.

डोनावर फरेरा ४४ चेंडूत सात चौकार व तीन षटकारांसह ६९ धावा करत बाद झाला, तर रवींद्र जडेजा ३२ चेंडूत पाच चौकारांसह ४५ धावा करत बाद झाला. यानंतर अखेरच्या षटकांमध्ये तुषार देशपांडेने ११ चेंडूत तीन षटकारांसह २५ धावांची खेळी केली. याशिवाय खालच्या फळीतील फलंदाजांना झटपट माघारी धाडण्याचे श्रेय साकिब हुसैनला जाते. हैदराबादकडून प्रफुल हिंगने चार षटकांत ३४ धावा देत चार विकेट्स घेतल्या, तर साकिब हुसैनेने चार षटकांत २४ धावा देत चार विकेट्स घेतल्या. याशिवाय इशान मलिंगाने दोन विकेट्स घेतल्या.

राजस्थानने प्रथम नाणेफेक जिंकत हैदराबादला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. हैदराबादची सुरुवातदेखील खराब झाली. पहिल्याच चेंडूवर आर्चरने अभिषेक शर्माला झेलबाद केले. यानंतर इशान किशनने ट्रॅव्हिस हेडच्या जोडीने संघाचा डाव सावरला. हेड १८ धावा करत बाद झाला. मग क्लासेन व इशानने ३९ चेंडूत ८८ धावांची भागीदारी रचली. क्लासेन २६ चेंडूत एक चौकार व तीन षटकारांसह ४० धावांची खेळी केली. इशानने ४४ चेंडूत आठ चौकार व सहा षटकारांसह ९१ धावांची मोठी खेळी केली, ज्यामुळे संघ मोठी धावसंख्या उभारू शकला.

नितीश कुमार रेड्डीने १३ चेंडूत चार षटकारांसह २८ धावांची झटपट खेळी केली, तर सलिल अरोरा १३ चेंडूत दोन चौकार व दोन षटकारांसह २४ धावा करत अखेरच्या षटकांमध्ये संघाला २०० पार नेऊन ठेवले. राजस्थानकडून जोफ्रा आर्चरने दोन, तर संदीप शर्मा, तुषार देशपांडे व रियान पराग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# चिपळे येथे आमदार चषक स्पर्धा रंगली

## भाताण संघ मानकरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिपळे येथे चिपळाई क्रिकेट संघ आणि ग्रामस्थ मंडळ यांच्या वतीने आमदार चषक २०२६ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत भाताण संघाने विजेतेपद पटकाविले. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पर्धेस उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले आणि खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

आझाद मैदानात खेळल्या गेलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजित पाटील, उपाध्यक्ष धनंजय पाटील, सुनील पाटील, मुकेश फडके यांच्या उपस्थितीत झाले.

स्पर्धेला रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, पनवेल महापालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, युवा नेते निलेश भगत, भूषण भगत, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, माजी सदस्य अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, पंचायत समिती सदस्य मयूर शेलार, सचिन केवारे माजी सरपंच सदाशिव वास्कर, सुनील माळी, रमेशशेठ पाटील, नरेशशेठ पाटील, नगरसेवक हॅप्पी सिंग, प्रवीण पाटील, अमर पाटील, अरुणकुमार भगत, विकास घरत, दशरथ म्हात्रे, मनोज भुजबळ, नगरसेविका मनाली ठाकूर यांच्यासह तेजस कांडपिळे, रविशेठ पाटील, उमेश इनामदार, विशाल पाटेकर आदींनी सदिच्छा भेट दिली.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक यंगस्टार बोनशेत, तृतीय साईरक्षा कोप्रोली, चतुर्थ स्किरा इलेव्हन बापदेव पाली, पाचवा जय भवानी वाजेपूर आणि सहावा क्रमांक पप्पन पेठ संघाने प्राप्त केला. सर्व विजेत्यांना रोख रक्कम आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही वैयक्तिक पारितोषिक देण्यात आले. ही स्पर्धा युवा नेते विश्वजित पाटील व सहकाऱ्यांच्या उत्कृष्ट नियोजन व परिश्रमातून यशस्वीपणे पार पडली.

# ग्रामीण प्रीमियर लीगचा वाघळी संघ मानकरी



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित ग्रामीण प्रीमियर लीग २०२६ क्रिकेट स्पर्धा वजरोली येथील कै. मधुशेठ काळे क्रीडांगणावर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत हर्ष हॉटेल वाघळी संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले, तर एमडी वॉरियर्स आमडोशी संघाने उपविजेतेपद मिळवले.

या स्पर्धेत तिसरा क्रमांक श्री मानकेश्वर प्रसन्न आमडोशी संघाने, तर चौथा क्रमांक आई पळसाई संघाने मिळवला. विजेत्या संघांना रोख रक्कम आणि आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभासाठी हर्ष हॉटेल वाघळी संघांचे मालक तुकाराम कदम, प्रकाश कदम, शरयू इंटरप्रायजेस वांगणी संघांचे मालक एकनाथ ठाकूर, शेखर ठाकूर, आई पळसाई संघांचे मालक प्रल्हाद राणे, सुभाष मढवी, सुरेश साळुंखे, अंकुश तेलंगे, एमडी वॉरियर्स संघांचे मालक महादेव दळवी, श्री मानकेश्वर आमडोशी संघांचे मालक अनिरुद्ध जाधव, महेंद्र कदम, मनोज वाजे, संदेश कासार, अनिल कासार, विराज दळवी, रोशन कडव, भरत यादव, आयोजक कमिटी अध्यक्ष विश्वास गायकर व त्यांचे सहकारी यांच्यासह ग्रामस्थ व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

यावेळी मालिकावीर, सामनावीर, सिक्सर किंग व पब्लिक हिरो म्हणून विकास जाधव याने बाजी मारली. उत्कृष्ट फलंदाज सिद्धेश तेलंगे, उत्कृष्ट गोलंदाज करण राणे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक आयर्न गायकवाड, तर उगवता तारा म्हणून संस्कृत हरपालचा गौरव करण्यात आला.

# कै. पूर्वा भगत स्मृती चषक कबड्डी स्पर्धेत धेरंड, पनवेल संघ विजेते



**अलिबाग : प्रतिनिधी**

ॐकार क्रीडा मंडळ वेश्वी (अलिबाग)तर्फे आयोजित कै. पूर्वा भगत स्मृती चषक जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात मरिआई धेरंड संघाने, तर महिला गटात कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल संघाने विजेतेपद पटकावले.

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ही स्पर्धा अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील जिल्हा परिषद शाळेच्या क्रीडांगणात दोन दिवस खेळवण्यात आली. पहिल्या दिवशी पुरुष गटाची स्पर्धा रंगली. पुरुषांमध्ये अलिबाग तालुक्यातील मरीआई धेरंड संघाने विजेतेपद पटकावले. जय हनुमान धेरंड संघ उपविजेता ठरला. वादळ खारीकवाडा संघाने तृतीय तर गावदेवी आंदोशी संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. मरीआई धेरंड संघाचा ऋत्विक पाटील याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक जय हनुमान धेरंड संघाचा स्मित म्हात्रे याला, तर उत्कृष्ट पक्कडीचे पारितोषिक वादळ खारीकवाडा संघाचा ओमकार मेस्त्री याला देण्यात आले. गावदेवी आंदोशी संघाचा रोहित शेळके पब्लिक हिरो ठरला.

दुसऱ्या दिवशी झालेल्या महिलांच्या स्पर्धेत कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल संघाने विजेतेपद पटकावले. पनवेल स्पोर्ट्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. भिल्लेश्वर किहीम संघाने तृतीय, तर ऋतिक्षा स्पोर्ट्स पेण संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून कर्नाळा स्पोर्ट्ची तेजा सकपाळ हिची निवड करण्यात आली. उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक किहीमची चैताली म्हात्रे हिला, तर उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक पनवेल स्पोर्ट्सची पायल निगडेला देण्यात आले. पेणची मल्लिका शिंदे पब्लिक हिरो ठरली.

या स्पर्धेला महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील, अलिबाग नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, सवाई पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या कार्यवाह चित्रा पाटील, वेश्वीच्या उपसरपंच आरती पाटील, सदस्य अनंत मुळूस्कर, राजेंद्र राऊळ, माजी उपसरपंच नरेश पडियार, अरुण पाटील आदींनी भेट दिली.

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या रायगड जिल्हा पुरुष संघातील खेळाडू, प्रशिक्षक, पंच यांचा तसेच रायगड जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकाविणाऱ्या ॐकार वेश्वी संघातील खेळाडूंचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# मराठमोळ्या प्रफुल्ल हिंगेने इतिहास रचला



**मुंबई : प्रतिनिधी**

सनराईजर्स हैदराबादचा युवा वेगवान गोलंदाज प्रफुल्ल हिंगने आपले आयपीएल पदार्पण स्मरणीय केले. त्याने राजस्थान रॉयल्सविरूद्धच्या सामन्यात इतिहास रचला. आयपीएलच्या १९व्या वर्षात पदार्पणात पहिल्या षटकात तीन विकेट्स घेण्याचा महारेकॉर्ड त्याने आपल्या नावे केला.

विदर्भाच्या या वेगवान गोलंदाजाने नव्या चेंडूवर राजस्थानच्या टॉप ऑर्डरची दैना उडवून दिली. २१७ धावांचे अवाढव्य आव्हान पार करण्यासाठी मैदानात उतरलेल्या राजस्थान संघाला सुरुवातीलाच धक्के देत हैदराबादने सामन्यावर पकड निर्माण केली.

प्रफुल्ल हिंगेने आपल्या पहिल्याच स्पेलमध्ये दोन षटकात फक्त सहा धावा देत चार विकेट्स घेतल्या. त्याने सुरुवातीच्या षटकातच राजस्थानची अवस्था ५ बाद ९ धावा अशी करून टाकली.

हिंगेने सामन्यानंतर सांगितले की, त्याने पदार्पणाच्या सामन्यात आपण चार ते पाच विकेट घेणार हे लिहून ठेवले होते. मी पॉवर प्लेमध्ये धडाकेबाज कामगिरी करण्याचा विचार केला होता. मी मॅनिफेस्टेशनवर विश्वास ठेवतो. वैभव सूर्यवंशीला बाऊन्सवर आऊट करणार हे आधीच ठरवले होते. वरूण भाईने मला हा प्लॅन करण्यास मदत केली होती.

### अशी आहे आतापर्यंतची कामगिरी

नागपूरच्या प्रफुल्ल हिंगेने २०२४-२५मध्ये विदर्भकडून वरिष्ठ संघात पदार्पण केले. तो २०२४-२५मध्ये रणजी ट्रॉफी जिंकणाऱ्या संघाचा महत्त्वाचा सदस्य बनला. त्याचबरोबर विजय हजारे ट्रॉफीमध्येही त्याने भरीव कामगिरी केली. त्याने आतापर्यंत १० प्रथम श्रेणी सामने खेळले असून त्यात २७ विकेट्स घेतल्या आहेत. त्याने सहा अ श्रेणीचे सामनेदेखील खेळले आहेत. त्यात पाच विकेट्स घेतल्या असून आतापर्यंत त्याने एकच टी-२० सामना खेळला आहे, ज्यात त्याने एक विकेट घेतली आहे. प्रफुल्लने विदर्भ प्रो टी-२० लीगमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली होती. तिथे त्याने सहा सामन्यात आठ विकेट्स घेतल्या होत्या.




# विस्डेन अवॉर्ड्समध्ये भारतीय क्रिकेटपटूंचा बोलबाला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विस्डेन क्रिकेटर्स अल्मॅनॅकने ऑस्ट्रेलियाचा शक्तिशाली वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कला जगातील आघाडीचा पुरुष क्रिकेटपटू म्हणून घोषित केले, तर भारताची उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्माला आघाडीची महिला खेळाडू म्हणून निवडले आहे. या पुरस्कारांच्या यादीत चार भारतीय क्रिकेटपटूंचाही समावेश आहे. हे पुरस्कार मागील वर्षासाठी असून ते दरवर्षी दिले जातात.

इंग्लंडविरुद्ध गत ॲशेस मालिकेत मिचेल स्टार्कने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. जवळपास ३६ वर्षांचा असलेल्या स्टार्कने २०२५मध्ये ११ कसोटी सामने खेळून ५५ बळी घेतले. या काळात त्याची सरासरी १७.३२ होती. स्टार्कने वेस्ट इंडिजविरुद्ध नऊ धावांत सहा बळी घेत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यानंतर त्याने पहिल्या दोन ॲशेस कसोटींमध्ये १८ बळी घेतले. इतकेच नाही, तर त्याने पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत ३१ बळी घेतले.

दीप्ती शर्माने नोव्हेंबरमध्ये भारताच्या ऐतिहासिक विश्वचषक विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्या स्पर्धेत दीप्तीने केवळ २१५ धावाच केल्या नाहीत, तर २२ बळीही घेतले. अंतिम सामन्यातील दीप्तीची कामगिरी कौतुकास्पद होती. म्हणूनच तिला या पुरस्काराने सन्मानित केले जात आहे.

याशिवाय भारतीय पुरुष संघातील खेळाडूंचाही विस्डेनच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. भारतीय वनडे आणि कसोटी कर्णधार शुबमन गिल, रवींद्र जडेजा, ऋषभ पंत आणि मोहम्मद सिराज यांचा वर्षातील पाच क्रिकेटपटूंमध्ये समावेश करण्यात आला आहे. या सर्व खेळाडूंनी गेल्या वर्षी भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत उत्कृष्ट कामगिरी केली होती. अभिषेक शर्माला सर्वोत्कृष्ट टी-२० क्रिकेटपटूचा पुरस्कार मिळाला.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –**मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com